||श्रीदत्त||

||श्री.प.प. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजविरचित श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार||

विषयानुक्रम

।।श्रीदत्त।।

।। श्री.प.प. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजविरचित श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार।।

।। नमः श्रीगणेशाय।। श्रीसद्गुरवे नमः।। अथ श्रीसप्तशतीगुरुचरित्रसारप्रारम्भः।।

नमः[१] श्री दत्तगुरवे ह्रद्वासोधौतिकारवे।। स्वात्मज्योतिःप्रकाशाय सुखायानर्थशान्तये ।।१।।

भूतं[२] भ व्यं भवच्चास्माज्जायते येन जीवति।। लीयते यत्र तद्ब्रह्म श्रीदत्ताख्यं त्र्यधीश्वरम् ।।२।।

भक्ति[३] ग म्यस्य तस्येदं चरितं चित्तशुद्धये।। संक्षेपेण स्फुटं वक्ति वासुदेवसरस्वती ।।३।।

ग्रंथीं वा सुदेव निमित्त । कर्ता करविता दत्त । तत्पदीं ठेवोनि चित्त । चरित ऐकोत संत हें ।।४।।

हें मा नु नी जे वाचिती किंवा भक्तिनें ऐकती । तेचि भवाब्धि तरती । उद्धरती निजकुळा ।।५।।

मना वा चा अगोचर । तो स्वच्छंदे हो गोचर । कलियुगीं यतीश्वर । नरसिंहसरस्वती ।।६।।

त्याचें च रित्र ऐकून । नामधारक ब्रह्मण । गाणगापुरीं दर्शन । घ्यावें म्हणून पातला ।।७।।

प्राणी ऊ ष्मानें तापून । इच्छिती छाया जीवन । तैसा त्रितापें तापून । ये लक्षून निजजीवना।।८।।

जो ऊ र्ध्व खालीं भरला । आंत बाहेर सांचला । नामधारक म्हणे त्याला । दत्ता मला भेट देई ।।९।।

तूंचि मू र्तिमंत ब्रह्म । त्रिमूर्ति तूं गुरु परम । कलियुगीं मंगलधाम । भक्तकामपूरक ।।१०।।

१. ह्रदयरूपी वस्त्राला धुऊन साफ करणाऱ्या, आपल्या आत्मरूप ज्योतीचा प्रकाशरूप, सुखरूप व सर्व अनर्थांची शांति करणाऱ्या श्रीदत्तगुरूला नमस्कार करितो. २. ज्यापासून भूत, भव्य व भवत् (सर्वविश्व) उत्पन्न होते व ज्याच्या योगाने जीवंत राहाते तसेच ज्याचे ठायी लय पावते ते त्रिगुणावर सत्ता करणारे ब्रह्म श्रीदत्तनामक आहे. ३. भक्तीने ज्याची प्राप्ती होते अशा त्या दत्तगुरूचे हे चरित्र चित्ताची शुद्धी होण्यासाठी प.प. श्री वासुदेवानंदसरस्वती संक्षेपाने स्पष्ट करतात.

विशा	ल	तव सत्कीर्ती । परिसोनि केली विनंती । तव कर्णावरी न ये ती । वाटे खंती सर्वज्ञा हे।।११।।
जरी	म	ज तूं नेणसी। तरी सर्वज्ञ कीं होसी । किंवा मातें उपेक्षिसी । दयाळूसी साजे हें कीं ।।१२।।
मी अ	धः	पाता जाईन । जरी देसी उपेक्षून । सेवा इच्छी की तव मन । तेणें होसी कीं दाता ।।१३।।
सेवा	शा	न ठेवून । मेघापरी दे जीवन । पूर्वी जेवी दिल्हें दान । बिभीषणध्रुवादिकां ।।१४।।
किं मु	ख	पसरितां । बाळापाशीं मागे माता। जरी बाळ मारी लाथा । तया माता टाकून दे कीं ।।१५।।
तूंची	म	म माता पिता । तूंचि एक कुळदेवता । भिन्न भाव येथें नसतां। कोण दाता मज दुजा ।।१६।।
नरे	श्व	र[1] सेवकवंशा । रक्षी न धरितां आशा । तूं अस्मत्पूर्वजेशा । सर्वेशा की उपेक्षिसी ।।१७।।
मी इ	त्थं	भूत सर्व । कथितां ही नये द्रव[2] । जेणें पाषाणा ये द्रव । तूं निर्द्रव होसी कैसा ।।१८।।
अशी	प्रा	र्थना करून । हो मूर्छित हें जाणून । दत्त चित्तीं प्रगटून । आश्वासन देयी स्वप्नीं ।।१९।।

इति श्री मत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीविरचिते सप्तशतीगुरुचरित्रसारे

चरितानुसंधानं नाम प्रथमोऽध्यायः।।१।।

१. राजा २. ओलेपण

टीप- प्रत्येक ओळीतील तिसरे अक्षर रांगेने वाचीत गेल्यास श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील पंधरावा अध्याय वाचल्याचे श्रेय अनायासे ऐवजीं लाभतें.

तें पा हु न येरु उठे । तया पुढें सिद्ध भेटे । तया पुसे कोण तूं कोठें । जासी वाटे मायबाप।।१।।

सिद्ध र म्य बोले वाचे । त्रिमूर्ति गुरु आमुचे । न देखती भक्त ज्याचे । तापदैन्याचे पसारे।।२।।

ऐसें व्य क्त ऐकून । नामधारक बोले दीन । मी त्याचा भक्त असून । कां लोटून देई मला।।३।।

विश्व यं त्र चालक दत्त । तेथें हा अस्थिरचित्त । हें जाणून बोले व्यक्त । सिद्ध मुक्तसंग जो।।४।।

तूं स्व च्छं दें वागसी । व्यर्थ देवा दोष देसी । कोप येतां इतरांसी । स्वभक्तांसी राखी गुरु।।५।।

एक दां तो कोपे जरि । न राखती हरहरी । येरु पुसे कवणेपरी । वद[1] थोरीव गुरूची।।६।।

म्हणे सि द्ध कलीप्रत । ब्रह्मा सांगे हें चरित । गोदावरीतीरस्थित । वेदधर्मशर्मा गुरु।।७।।

तो स्वी य पातकान्त । करावया ये काशींत । तया दीपक सेवित । स्वयें कष्ट साहोनिया।।८।।

सुहा स्य मुखें सेवा करी । गुरु शिव्या देइ मारी । न धरी तें अंतरीं । क्षालन करी मळमूत्र।।९।।

अंध प ङ्गु गलत्कुष्ठी ।गुरु झाला महाकष्टी। शिष्या गांजी सेवेसाठी। तरी करी सेवा शिष्य।।१०।।

अप र्णा पति[2] हो प्रसन्न । शिष्या देयी वरदान । नाही गुर्वाज्ञा म्हणून । फिरवून धाडी शर्वा[2]।।११।।

त्याचा नि श्चय जाणून । वर दे विष्णूही येऊन । शिष्य बोले सर्व दान । देयील पूर्ण गुरु माझा।।१२।।

निश्च य त्याचा ओळखून । विष्णू भुक्तिमुक्तिदान । दे, गुरुही हो प्रसन्न । काय न्यून तया शिष्या।।१३।।

हो अ स्तं गत माया । गुरु प्रसन्न हो जया । भज सोडोनि संशया । करील दया त्रिमूर्ति हा।।१४।।

इति श्री. प. प. वा. स. वि. स. गु. दीपकाख्यानं नाम द्वितीयोऽध्यायः।।२।।ग्रं. सं.।।३३।।

१. सांग २. शंकर

ऐसें वे दधर्माख्यान । नामधारक ऐकून । पुसे कां हा देव असून । अवतरून ये येथे ।।१।।
कां घे द शावतार हे । सिद्ध म्हणे ऐक तूं हें । अंबरीषाकरितां हें । नटन आहे नारायणा ।।२।।
दुर्वा स ऋषी द्वादशीसी । आला अंबरीषापाशीं । लावी विलंब कर्मासी । हो मानसीं खिन्न भूप ।।३।।
टळे वे ळा हें जाणून । राजा करी जलपान । गर्भवासा जा म्हणून । दे कोपून ऋषी शाप ।।४।।
तेव्हां द याळु येऊन । स्वयें शाप स्वीकारून । अवतरे नारायण । जो असोन सर्वव्यापी ।।५।।
इति श्री. प. प. वा. स. वि. स. गु. अंबरीषोपाख्यानं नाम तृतीयोऽध्यायः।।३।।ग्रं. सं.।।३८।।

बहु वित् सिद्धा पुसे द्विज। अत्रि कोण सांग मज। त्रीश[1] केवी हो अत्रिज[2]।सिद्ध गुज ऐक म्हणे ।।१।।
जाण अ त्रि ब्रह्मपुत्र । अनसूया तत्कलत्र[3]। दंपती परम पवित्र । त्यांचा पुत्र दत्तात्रेय ।।२।।
निर्बा ध अनसूयेचें । व्रत पाहुनी तें साचें । मन भ्याले सर्व सुरांचे[4] । अबोधाचें बीज हें कीं ।।३।।
ते नि श्चो तद्धैर्य[5] देव । त्रिमूर्तीपाशीं घेती धांव । आश्वासोनी त्यांते देव[6]। भिक्षुभाव स्वीकारिती ।।४।।
ते ऊ र्ध्व लोक सोडुनी । भिक्षुकसे होवुनी । तिघे आले अत्रिसदनीं । जातां रानीं मुनिवर्य ।।५।।
त्यां कि म्प्र योजन ऐसें । अनसूया पुसतसे । नग्नभिक्षा दे तूं ऐसें । याचितसे देवत्रय ।।६।।
जरी सृ ती[7] सोडिती ते। तरी सती वदे त्यांते। तसीच मी तुम्हां देतें । स्वस्थचित्तें भिक्षा करा ।।७।।
स्वव्र ता च्या सामर्थ्ये ती। अत्रिपदा चिंती चित्तीं। अतिथी बाळ कल्पुनी ती। सती नग्न होती झाली।।८।।

१. तीन देवांचा स्वामी २. अत्रिपुत्र ३. भार्या ४. देवांचे ५ गळत आहे धैर्य ज्याचे ६. ब्रह्मा विष्णु महेश्वर ७. मार्ग

सु दु	स्त	र ज्यांची माया । सहसा बालत्व ये तयां । तें पाहून अनसूया । विस्मया पावली ती॥९॥
सुहा	स्य	मुखी घे बालां। तंव स्तना पान्हा आला। पाजी एका एका बाला। जी विमला पातिव्रत्यें॥१०॥
त्यांचीं	शा	न्त झाली मनें । पतिव्रतास्तनपानें । पाळण्यांत घालुनि गाणें । ती प्रीतीनें गायी साध्वी॥११॥
ती सु	खा	नें गातां मुनि । तेव्हां आला वनांतुनि । ज्ञानें त्रिमूर्ति जाणुनि । स्तवुनि तोषवी त्याला॥१२॥
त्यांचे	गु	ज तें जाणुनि । राहिले सुत होऊनि । निजरूपेंहि स्वस्थानीं । जाती तीनी देव हर्षें॥१३॥
सगु	ण	त्वा आले त्यांची । अत्रि नामें योजी साचीं । चंद्र दत्त दुर्वासाचीं । ब्रह्मा विष्णू महेश्वर॥१४॥
चंद्र	प्र	णाम करूनी । चंद्रलोका गेला, मुनि । दुर्वासा फिरे भुवनीं । स्वसदनीं राहे दत्त॥१५॥
तो नि	वृ	त्तिमार्ग[1] दावी । भक्तांचें काम पुरवी । स्मर्तृगामी[2] पुनः भुवि । अवतरे श्रीपादाख्य॥१६॥

इति श्री. प. प. वा. स. वि. सारे. अनसूयोपाख्यानं नाम चतुर्थोऽध्यायः॥४॥ग्रं. सं.॥५४॥

ये श्रा[3]	द्धा	हीं विप्राघरीं । उत्तरदेशीं भिक्षा करी । श्राद्धापूर्वी द्विजनारी । दान करी श्राद्धान्नाचें॥१॥
दत्त	वि	प्रस्त्रीचा भाव । पाहुनी सुत स्वयमेव । झाला श्रीपादराव । गृहभाव[4] स्वीकारीना॥२॥
विशे	ष	विद्याभिज्ञ झाला । तात आरंभी विवाहाला । पुत्र म्हणे योगश्रीला । वरीं, अबला सर्व माता॥३॥
निश्च	य	हा ते ऐकून । खिन्न होती त्यां दावून । त्रिमूर्तिरूप, आश्वासून । बंधू दोन पंग्वंध जे॥४॥
करी	प्र	भू त्यांवरी डोळा। चालूं लागला पांगळा। पाहूं लागला आंधळा। अतर्क्य लीला श्रीपादाची॥५॥

१. मोक्षमार्ग २. स्मरणमात्रें सांपडणारा ३. श्राद्धदिवशी. ४. गृहस्थाश्रम

आशीर् वा द देई तयां । काशीपुरा जाऊनियां । बदर्याश्रम पाहुनियां । श्रीपाद ये गोकर्णासी।।६।।

विम[1] लाः कीर्तयो यस्य । श्रीदत्तात्रेय एव सः । कलौ श्रीपादरूपेण । जयति स्वेष्टकामधुक्।।७।।

इति श्री. प. प. वा. स. वि. सारे. श्रीपादावतारकथनं नाम पंचमोऽध्यायः।।५।।ग्रं. स.।।६१।।

कथा अ सी परिसून । नामधारक करी प्रश्न । म्हणे सर्व क्षेत्रें त्यजून । ये गोकर्णक्षेत्रीं कां हा।।१।।

शैव ध र्मे रावणमाता । कैलासाची धरूनि चिंता । मृण्मयलिंग पूजितां । ये श्रीमत्ता सुता खेद।।२।।

तो आ श्च र्य मानून । म्हणे कैलास आणून । देतों दे ही माती त्यजून । असें म्हणून चालिला।।३।।

बळें मू ळासह कैलासा। उचलितां हाले सहसा। भिऊनी गौरी वदे गिरिशा। प्रळय कसा हा वारीं।।४।।

तैं कै ला सा चेपी हर। खालीं रगडे निशाचर । मरणोन्मुख हो करीं स्तोत्र । तेणें हर प्रसन्न हो।।५।।

त्वद न्य न मला त्राता। तूंचि माझा प्राणदाता। दयाळू तूं राखें आतां । असें म्हणतां सोडी शंभू।।६।।

त्वां अ नु मान न करितां । शिवा सोडविलें आतां । असे म्हणूनी तो गीता । गाता झाला सप्तस्वरें।।७।।

गायी सं (म्)यक् रागरागिणी । निजशिर छेदुनि । त्याचा वीणा करूनी । काल साधुनि प्रेमानें।।८।।

शिव त याच्या गाण्यासी। भुलोनी ये तयापाशीं। आत्मलिंग देऊनि त्यासी। म्हणे होसि तूंचि शंभू।।९।।

ये हा ता अमरता । तीन वर्षे हें पूजितां । लंका कैलासचि ताता । होईल आतां निःसंशय।।१०।।

अव[2] नि वरी मध्यें जरी । ठेवितां न ये करीं[3] । येणेपरी नेई पुरीं । काय करिसी कैलासा।।११।।

१. ज्याच्या कीर्ति शुद्ध आहेत तोच दत्तात्रेय कलियुगामध्ये आपल्या भक्तांचे इच्छित मनोरथ पूर्ण करणारा श्रीपादरूपानें आहे.
२. भूमीवर. ३. हातांत.

शिवा क रूनी नमन । पुरा जाई रावण । त्वरें नारद जाऊन । करी कथन सर्व इंद्रा।।१२।।
अध र्मा त्या जाणून । इंद्र ब्रह्मां दे सांगून । तोही विष्णूसी कथून । ये घेऊन शिवाप्रती।।१३।।
त्या अ नु चितकर्में हर । पश्चात्तापें म्हणे विसर। पडला झाला पाव प्रहर । गेला क्रूर येथोनिया।।१४।।
देव बं दींत पडले । विष्णू म्हणें तुज कळलें । तरीं कां हें असें केलें । जड ठेलें पुढें मज।।१५।।
जो आ धी मारी जीव । तया केला चिरंजीव । वरदान सांगे शिव । म्हणे उपाय करीं तूं।।१६।।
ऐसें नि गुती ऐकून । नारदा दे पाठवून । विष्णू करावया विघ्न । धाडी विघ्नविनायकांते।।१७।।
मुनी म नो वेगें तया। गांठूनी लोटी काळ वायां । धाडी संध्या करावया । गणराया तंव आला।।१८।।
त्या मा नु नी ब्रह्मचारी । तो न घेतां त्याचे करीं । रावण दे लिंग तरीं । अवधारी म्हणे बटू[२]।।१९।।
स्वपो ष्य मी अतिदीन । तीन वार बोलावीन । जड होतां खाली ठेवीन । दोष न मग मला।।२०।।
स्वर्ग लो कीं सुर पहातां। बोलावी त्या अर्घ्य देतां। तीन वेळ तो न येतां। तो स्थापिता झाला लिंग।।२१।।
त्याने के ले तें स्थापन । रावणा न हालें म्हणून । महाबळी हो गोकर्ण । क्षेत्र जाण भूकैलास।।२२।।

इति श्री. प. प. वा. स. वि. सारे. गोकर्णमहाबळेश्वरप्रतिष्ठापनं नाम षष्ठोऽध्यायः।।६।।ग्रं. सं.।।८३।।

१. हातांत. २. ब्रह्मचारी

होता न रपती[१] एक । मित्रसह तत्सेवक । श्राद्धीं नृमास[२] दे ठक । वसिष्ठादिक ऋषींसी।।१।।
ऋषी रु से देयी शाप । ब्रह्मराक्षस हो भूप । विप्रा मारी तत्स्त्री[३] शाप । दे स्त्रीसंपर्के मरसी।।२।।
तो भू प बारा साल । जातां प्राग्वत् हो विमल । सांगे राणीसी सकल । शापबोल ब्राह्मणीचा।।३।।
दुःखें म रूं इच्छी राणी । राजा तिला सांवरोनी । केलें पाप सांगोनी । तारा म्हणूनी प्रार्थी विप्रा।।४।।
मन[४] स्ये कं वचस्येकं । असा नोहे हा सेवक । हें जाणोनी द्विज लोक । सांगे सम्यक् तीर्थयात्रा।।५।।
ब्रह्म ह त्त्या न जाय ती । मग भूपा वाटे भीति । मिथिलापुरी महामती । सांगे खंती गौतमातें।।६।।
मुनी त या आश्वासून । सांगे क्षेत्र गोकर्ण । तेथें दोष निवारून । तूं पावन होसील बा।।७।।
ऐक थो डेसें आख्यान । म्यां देखिलें तें सांगेन । शिवदूत येती धांवून । चंडाळी मरतां एक।।८।।
हर्ष प हातां हो तयां । म्यां पुसतां, करूनी दया । सांगती मातें राया । विप्रजाया[५] प्राग्जन्मी हे।।९।।
ही बा ल विधवा झाली । जारकर्मीं रमली । स्वजनांनीं सोडिली । व्यक्त झाली वैश्यकांता।।१०।।
अस भ्य संगें दुष्ट । जारकर्मे झाली भ्रष्ट । मद्यमांसें झाली पुष्ट । नेणे कष्ट पुढील ती।।११।।
मत्ता ते मेष म्हणून । गोवत्सा खायी मारून । दुजे दिनीं शिर पाहून । शिव म्हणून छपवी तें।।१२।।
असी नां दतां ती मेली । गोवधें हो चंडाळी । अविचारें हो आंधळी । व्रणें झाली जारकर्मे।।१३।।
असी तो कपणें[६] झाली । मायबापें रक्षियेली । लवकर तेही मेले । पोरी झाली निराश्रय।।१४।।
ती ज न संयोगेशीं । आली गोकर्णक्षेत्रासी । वस्त्रहीन उपवासी । व्रतदिवशीं मागे अन्न।।१५।।

१. राजा २. नरमांस ३. मारलेल्या विप्राची स्त्री ४. मनांत एक, वाणींत दुसरे. ५.ब्राह्मणभार्या ६. बालपणी

ती या[1] चा वया[1] कर । पुढें करी, कोणी नर । करीं [2] टाकी बिल्वपत्र । टाकी दूर हुंगोनी ती।।१६।।
पडे दि ष्टें[3] लिंगावर । तेणें तुष्टें गौरीवर । करी इला भवपार । धाडी शीघ्र आम्हां येथें।।१७।।
पुन र्न जन्मेल ही । म्हणोनियां नेली त्यांही । गौतम म्हणे तूंही । नृपा पाहीं गोकर्णातें।।१८।।
नृप च मत्कार मानून । जातांची हो पावन । तेथ साक्षाच्छिव जाण । म्हणोन ये श्रीपाद।।१९।।
इति श्री. प. प. वा. स. वि. स. सारे. गोकर्णश्रेत्रवर्णनं नामं सप्तमोऽध्यायः।।७।।ग्रं. सं.।।१०२।।

सिद्ध सं क्षेपें सांगत । श्रीपाद तेथूनि येत । कृष्णातीरीं होयी स्थित । कुरुपुरांत[4] तारक।।१।।
मूर्ख प्र जासमवेत । लोकनिंदेने हो त्रस्त । जीव द्याया कृष्णेंत । अकस्मात देखे देव।।२।।
प्रभू ति ला निरोपिती। आत्महत्या दुस्तर म्हणती। जन्मांतरी सुपुत्राप्ती[5]।व्हाया प्रार्थी मग ती नारी।।३।।
तन्नि ष्ठा ओळखून । गुरु सांगती आख्यान । उज्जनीत चंद्रसेन । शिवार्चन करी प्रदोषीं।।४।।
त्याचा अ मूल्य सन्मणी । हराया नृप तत्क्षणीं । घेवोनी अक्षौहिणी[6] । उज्जनी वेढिती ते।।५।।
हस्त्य श्व रथपत्तीं[7] । पाहोनी न भी चित्ती । शिवा पूजी तो भूपती । तें देखती गोपपुत्र।।६।।
अश्व त्थ संनिधानी । अंगणी ते पाषाणी । पूजितीं, त्यां नेती जननी । पूजनी रमे एक बाळ।।७।।
राहे मे ळा जातां एकला। पूजा लोटुनि माता त्याला। ओढी तो मूर्छित पडला।शिव त्याला दे सायुज्य।।८।।

१. मागावया २. हातांत ३. दैवयोगाने. ४.. यास कुरुगुड्डी म्हणतात ५. प्राप्ती ६. २१८७० हत्ती, २१८७० रथ, ६५६१० अश्व, १०९३५० पायदळ मिळून २१८७०० संख्येस अक्षौहिणी म्हणतात ७. पायदळ

पुढें नं दस्त्री होऊन । माता लाहे कृष्णनंदन । ज्योतिर्लिंग तें देखून । द्वेष सोडून जाती राजे।।९।।

पुढें सु त व्हावा तरी । शनिप्रदोष तूं करीं । येरु म्हणे तुम्हासरी । जन्मांतरी पुत्र व्हावा।।१०।।

जो भा वि कां देई वर । तथा म्हणूनी शिरावर । मूर्खपुत्राच्या धरीं कर । विद्वद्वर तो जाहला।।११।।

ती क रु नी प्रदोषपूजा । पुढें झाली विप्रात्मजा[1] । स्वसमान नाहीं दुजा । म्हणूनी हो तत्सुत दत्त।।१२।।

इति श्री. प. प. वा. स. वि. स. सारे शनिप्रदोषव्रतकथनं नाम अष्टमोऽध्यायः।।८।।ग्रं. सं.।।११४।।

सु रू ढ भक्ती एक । श्रीपादाचा सेवक । होता जातींचा रजक । नित्य एकभावे वंदी।।१।।

तो न मू नि गुरुवर्या । वस्त्रें धूतां भूपैश्वर्या । देखे इच्छी स्वये तया । गुरुराया तें जाणत।।२।।

त्या बो ल ती तूं भक्ता । सुखें राज्य करीं आतां । पुढे देवू कीं वद आतां । तो म्हणे झालों वृद्ध।।३।।

पुढें म ला द्या यौवनीं । असो तुझी स्मृती मनीं। गुरु बोले म्लेच्छसदनी । राजा होसी,अंतीं भेटूं।।४।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. स.सारे रजकवरप्रदानं नाम नवमोऽध्यायः।।९।।ग्रं. सं.।।११८।।

सत्य सं कल्प दे तसें । स्वयें अवतरसे । कुरपुरीं भेटतसे । ऐक असे विप्र एक।।१।।

करी ग रीब तो व्यापार । लाहे नवसें द्रव्य फार । यात्रे जातां मार्गी चोर । तया ठार मारिती।।२।।

१. ब्राह्मणाची कन्या

श्रीश	श	स्त्रें मारी चोरां । जीववी द्विजवरा । राखी एका सभ्य चोरा । स्वयें गुप्त हो श्रीपाद।।३।।
ते श	स्त्रें मेले त्यांतें । द्विज जाणोनी धनांते । घेऊनी ये कुरुपुरातें । दे नवस हो कृतार्थ।।४।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. स. सारे. श्रीपादमहिमावर्णनं नाम दशमोऽध्यायः।।१०।।ग्रं. सं.।।१२२।।

ब्राह्म	ण	स्त्री करंजपुरीं । हो अंबाख्या सुंदरी । प्राक्संस्कारें प्रदोष करी । तिला वरी माधव विप्र।।१।।
झाली	दृ	ढधी[१] गर्भिणी । बोले तत्त्वज्ञान जनीं । शोभली ती संस्कारांनी[२] । शुभलग्नीं प्रसवली।।२।।
तो प	ढे	बाळ ओंकार । पिता करी तत्संस्कार[३] । होती सर्व हृष्टतर । अवतार हा म्हणती।।३।।
करू	न	नामकर्मा । नाम घेती नृहरि शर्मा । पिता वेंची धन, धर्मा । चित्र नर्मा[४] दावी बाळ।।४।।
न इ	च्छि	शिशु बोलाया । तया मूक मानूनियां । ते करिती बहु उपाया । बाल तयां दावी खूणां।।५।।
मूक	त्वा	टांकी तेव्हा । बांधाल मुंजी जेव्हा । असें म्हणूनी करी तेव्हा । बाल लोहाचे सुवर्ण।।६।।
बोल	त	याचा मानून । करिती व्रतबंधन । मातेपाशीं भिक्षा दान । मागे तीन वेद पढें।।७।।
जै प्रा	तः	काल येतां । अंधःकार जाय अस्ता । तेंची बाळें वेद पढतां । मर्त्यताधी[५] लोपली।।८।।
सर्वा	प	रम हर्ष झाला । बटु प्रार्थी मातेला । स्वीकारूं संन्यासाला । होती तुला पुत्र पुत्री।।९।।
माता	दं	भोलीपातसें[६] । ऐकतांचीं पडतसें । सांवरोनी बोलतसे । क्रम असे संन्यासासी।।१०।।

१. दृढनिश्चयी २. पुंसवनादि ३. जातककर्मादि ४. लीला. ५. मनुष्यबुद्धि ६. वज्रपात

वेदां त ब्रह्मचर्यादि । क्रम असे नच आधीं । अन्यथा पडें मधीं । पुत्र सुधी ऐक म्हणे।।११।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. नृसिंहावतारो नाम एकादशोऽध्यायः।।११।।ग्रं. सं.।।१३३।।

सच्चि त्प रब्रह्म श्रवण । न्यास[१] हेतू तत्कारण । वैराग्य न क्रम[२] जाण । आळस न कीजे येथ।।१।।

कां वा रि सी तूं मज । आयुष्य जेवीं वीज । क्षणभंगुर देह तुज । कळे सहज मृत्यू न कीं।।२।।

येथ मा नवांची काय । कथा मृत्यू देवां खाय । न ये गेलेलें आयुष्य । कळे काय केव्हां पडे।।३।।

सन्मा र्गि न करी विघ्न । सुपुत्रा तूं होसी म्हणून । मस्तकीं हस्त ठेवून । पूर्व स्मरण तिला देई।।४।।

म्हणे त नया श्रीपादा तूं। एक पुत्र होता जा तूं। सुत म्हणे पुरतां हेतू। आज्ञा दे तूं म्हणूनी राहे।।५।।

ज्यांचे व्यं ग अध्ययन । जे म्हणविती प्राज्ञ[३] । तेही त्यापाशी येऊन । अध्ययन करिती नित्य।।६।।

ती मा य गर्भिणी झाली । पुत्र दोन प्रसवली । त्या बाळें आज्ञा घेतली । वाट धरिली काशीची।।७।।

तो स स्मि त बोले तयां । पुनः भेटे म्हणुनियां । काशीमध्ये येवोनियां । धरीं धैर्या करी योग।।८।।

महा न्ग तस्मय[४] जाणून। न्यासमार्ग[५] स्थापीं म्हणून। विप्रें प्रार्थितां तो प्राज्ञ। स्वयें संन्यासी होतसे।।९।।

जो हो ता तेथें यती । वृद्ध कृष्ण सरस्वती । तया वरूनी गुरु होती । नरसिंहसरस्वती।।१०।।

होऊ न नर आपण । गुरूचे गुरु असून । रामकृष्णापरी जाण । गुरु करून घेती गुरु।।११।।

१. संन्यास २. ब्रह्मचर्यादि ३. विद्वान ४. मदहीन ५. संन्यासमार्ग

स्थापू नि श्रौतधर्म[१] । फिरे सर्व तीर्थाश्रम । माधवा दे आश्रम[२] । वळे जन्मभूमीकडे।।१२।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. संन्यासदीक्षाग्रहणं नाम द्वादशोऽध्यायः।।१२।।ग्रं. सं.।।१४५।।

बाळ व र्य ज्ञानज्योति । कृष्णमाधवसरस्वती । सदानंदोपेंद्रयती । सातवा मी हे मुख्य शिष्य।।१।।
अधू र्त सर्व शांत । गुरु ऐशां शिष्यांसहित । आले जन्मभूमीप्रत । हो माताही यतिवंद्या।।२।।
विन न्ति करूनीं नर । विश्वरूपा घरोघर । न्हेती, देती गुरुवर । परंपार[३] मायबापां।।३।।
तो प्र भू म्हणे भगिनीला । दंपती-भेद केला । त्वां लाथिलें हो धेनुला । पती त्यजील कुष्ठी होसी।।४।।
ते भू[४] यः प्रार्थिता म्हणती। वृद्धत्वीं पति हो यति[५]। कुष्ठाची करीन शांती। स्त्रियां पति गती न अन्य।।५।।
असें त ये वेळीं तिला। सांगोन शिष्यमेळा । घेवोनि ये गोदावरीला । भूगोला उद्धरी जो।।६।।
शिष्य मे ळवी आणिक । माधवारण्यसंज्ञक । ज्ञान देऊनी सम्यक् । विशोक[६] केला गुरूनें।।७।।
गुरु व र्य पुढें येती । तेंथ एका विप्रा पाहती । मराया ये गोदेप्रति । दगड पोटीं बांधोनियां।।८।।
तया चा तो जाणून भाव। शिष्यां म्हणती घ्यारे धांव। शिष्यें घेवोनियां धांव। तयास जवळ आणिला।।९।।
तो सा द्यं त पुसतां वदे । शूलपीडित मी प्राण दें। कुकर्म केलें पूर्वी मदें। त्याचें फल दे देव हें कीं।।१०।।
नाहीं पु ण्य पूर्वापार । मी झालों भूमिभार । गुरु म्हणती अनिवार । दोष फार आत्मघातें।।११।।

१. देवधर्म (अग्निहोत्री) २. संन्यास ३. मोक्ष ४. वारंवार ५. संन्यासी ६. शोकरहित

तूं म रु नको रोगावर । औषध देतों मी शीघ्र । ऐसें म्हणती गुरुवर । तंव ये विप्र सायंदेव।।१२।।
तो तो ष वी श्रीगुरूसी। म्हणे द्विज मी कांचीवांसी । गुरु म्हणती हा उपवासी । या द्विजासी जेवूं घालीं।।१३।।
हें सा म्प्र त करीं काज । सायंदेव म्हणे हा द्विज । अन्नवैरी झाला आज । दोष ये मज हा मरतां।।१४।।
अपू[1] प दे म्हणती तया । तें मानून गुरुराया । भिक्षेला ने प्रार्थुनियां । द्विज शिष्यांसमवेत।।१५।।
धू पा[2] द्ये गुरूचे पाद । पूजी विधीनें वंदी पाद । जेववी सर्वां, हो सानंद। झाला विगद[3] तोही विप्र।।१६।।

इति श्री. प. प. वा. स. वि. स. सारे. विप्रशूलहरणं नाम त्रयोदशोऽध्यायः।।१३।।ग्रं. सं.।।१६१।।

तो सा य न्देव म्हणे । म्लेंच्छराजा माझें जिणे[4] । हरील वाटे आजी त्याणें । बोलवणें केलें आहे।।१।।
मीं अ तः पर न डरें। गुरु म्हणती तूं जा त्वरें। परतवील तो सत्कारें। म्हणुनी करें[5] आश्वासिती।।२।।
हाची प्र साद म्हणून । सायंदेव जातां यवन । मृतप्राय हो भिऊन । गौरवून त्या बोळवी।।३।।
वंश वृ द्धि निजभक्ती । गुरु देऊन, पुनः भेटी । सायंदेवा दावू म्हणती । गुप्त होती पुढें स्वयें।।४।।
निवृ त्तिः श्रीगुरुपदैः । सर्वत्रात्र प्रकाशिता । प्रस्थाप्य तीर्थयात्रायै । स्वान्गृहीताऽप्रकाशिता[6] ।।५।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे.सायंदेववरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्यायः।।१४।।ग्रं. सं.।।१६६।।

१. पिठाचे पदार्थ २. पाद्याने ३. रोगमुक्त ४. वाचणे ५. हस्ताने ६. येथे श्रीगुरूंनी सर्वत्र निवृत्ति दाखवली व आपल्या भक्तास तीर्थयात्रेस पाठवून गुप्त झाले.

शिष्यां प्र ति गुरु म्हणती । तीर्थे हिंडा सर्वक्षिती । भेटू श्रीशैलावरती । ते म्हणती दवडू नका।।१।।
हे सं[१] सृ तिहर पाद । हेची सर्वतीर्थास्पद[२] । गुरु म्हणती निर्विवाद । चला खेद सोडूनियां।।२।।
वाक्य ता दृश तें ऐकूनी । भावें शिरसा मानुनी। म्हणती जावें कोण्या स्थानीं। तें ऐकूनी गुरु बोले।।३।।
सात पु री धाम चार । बारा ज्योतिर्लिंगे थोर । आचरतां बहु कृच्छ्र । फळ हो, दूर जाय पाप।।४।।
आच रा वें तीर्थी क्षौर । जसा असे स्वाधिकार । तसा श्राद्धादिप्रकार । करितां दूर नसे क्षेम[३]।।५।।
जे को णी जितुके गांव । तीर्था जाती ठेवूनि भाव । तितुके कृच्छ्रफळ अपूर्व । तरती पूर्वज तयांचे।।६।।
पाहु नि नदीसंगम । न्हातां पुण्य उत्तम । ऋतु निवर्ततां ग्रीष्म । तीर्थधाम[४] विटाळे।।७।।
स्वध र्मा नें आठ मास । फिरा ठरा चार मास । नवें जळ यें नदीस । दहा दिवस ये विटाळ।।८।।
दोष न च तीरस्थांसी । तीन दीन महानदीसी । अहोरात्र -हदकूपासी[५] । करा ऐसि यात्रा तुम्हीं।।९।।
पाप मो चन होइ ज्ञान । वर्ष येतां बहुधान्य । श्रीशैलावर मी भेटेन । तथास्तु म्हणून ते गेले।।१०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. तीर्थयात्रानिरूपणं नाम पञ्चदशोऽध्यायः।।१५।।ग्रं. सं.।।१७६।।

तो म हा त्मा लोटुनी शिष्यां। स्वयें कोठें राहोनियां। काय करी असे तया। विप्रें पुसतां सिद्ध सांगे।।१।।
सवें जि तात्मा मी एक । वैजनाथीं गुरुनायक। असतां विप्र आला एक । सांगे दुःख गुरूनें दिल्हे।।२।।

१. संसार २. स्थान ३. कल्याण ४. स्थान किंवा तेज ५. डोह

गुरु त या धिक्कारून । म्हणती तूं रे जा येथोन । येरु धरूनियां चरण । गुरुसेवन सांगा म्हणे।।३।।

गुरु सं तोषें बोलती । ब्रह्मा विष्णू शिव मूर्ति । गुरु ब्रह्म साक्षात् म्हणती । भक्तां देती ते सर्वार्थ।।४।।

सेवा ग हन वाटे तरी । गुरु आपुल्या शिष्या तारी । कथा झाली हे द्वापारी। अवधारी मी सांगतो।।५।।

धौम्य दो षज्ञ[1] गुरु भला। तिघे शिष्य होते त्याला। कठीण सेवा सांगे त्याला। न वेदांसी सांगे पूर्वी।।६।।

विशे षा र्थ न सांगती । हृच्छुध्यर्थ सेवा घेती । वळखूनी प्रसन्न होती । रहाटी ऐसी गुरूची हे।।७।।

धौम्य अ शा रीतीं शिष्या। अरुणा म्हणे शेती तोया[2]। न्हेयी म्हणतां तो न्हे तोया। तें न जाय शेताकडे।।८।।

मनीं घ्या यी गुरुपद । जलामध्ये पडे सानंद । जळ क्षेत्रीं ये स्वच्छंद । गुरु प्रसाद करी तेव्हां।।९।।

अध्या त्म ज्ञानी तो झाला । तया गेहा पाठविला । धौम्य सांगे बैदाला । ह्या शेताला यत्नें राखीं।।१०।।

राखो नि तो मळी धान[3] । गुरूला तें दे सांगून । गाडा रेडा एक देऊन । म्हणे आण धान्य घरी।।११।।

गाडा त्या धान्यें भरून । आणितां पंकीं[4] तो गढून । गेला तंव गुरु येऊन । त्या काढून प्रसन्न हो।।१२।।

सर्व वि द्या आल्या त्याला । तया गेहीं पाठविला । गुरु म्हणे उपमन्यूला । तूं धेनूला वनीं चारी।।१३।।

नेवो नि तो गुरें रानीं। चरवी तेथें भिक्षा करूनी। गुरु मागे तें जाणुनी। भिक्षा आणुनि दे ती मला।।१४।।

द्विरा[5] वृ त्ती भिक्षा करी । शिष्य एक देई घरीं । तें जाणुनी गुरु दुसरी । भिक्षा घरीं देई म्हणे।।१५।।

दुश्चि त्त तो नच होई । दोनी भिक्षा घरीं देई । वत्सोच्छिष्टपय[6] घेई । गुरुमायी वारी तया।।१६।।

तो अर् का चें[7] क्षीर पीतां । होई अंध कूपीं पडतां । कृपा आली गुरुनाथा । दृष्टी देता झाला मंत्रें।।१७।।

१. दोष जाणणारा. २. उदक ३. (हिंदुस्थानी शब्द) धान्य ४. चिखलांत ५. दोन वेळ ६. उष्टे दूध ७. रुईचे

सत्का[१] माः फलंतु ते । हें म्हणोनि धाडी त्यातें । तो हो कृतार्थ कीर्तीतें । तच्छिष्यें मिरविली।।१८।।

जग द्वं द्य शिष्य झाला । सतक्षकेंद्र[२] पाडिला । गुरुतोषाची ही कला । जा तूं गुरूला पुनः सेवीं।।१९।।

तो त द्वै रें अनुतापला । मग तारिती गुरु त्याला । आले भिल्लवाडीला । वास केला चार मास।।२०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. शिष्यत्रयाख्यानं नाम षोडशोऽध्यायः।।१६।।ग्रं. सं.।।१९६।।

जे च र्वि त चर्वणसे । विषय भोगिताति पिसे । तारावया तयां असें । करीतसे गुरु कर्म।।१।।

विप्र मु ख्याचा सुत एक।कोल्हापुरीं होता मूर्ख।पशु म्हणती सर्व लोक।निंदिती, दुःख वाटे त्यातें।।२।।

विर क्ता परि तो येऊन । भुवनेश्वरीसी प्रार्थून । न होता ती सुप्रसन्न । जिह्वा छेदून देतसे।।३।।

शिर स्सु मन द्याया चिंती। देवी धाडी त्या गुरूप्रती। गुरु जिह्वा देती, करिती। सुमती, जाती गुरु पुढें।।४।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. छिन्नजिह्वादानं नाम सप्तदशोऽध्यायः।।१७।।ग्रं. सं.।।२००।।

सुरे ख क्षेत्र गुरु पाहे । कृष्णा पंचगंगा वाहे । तेथें द्वादशाब्द राहे । अजुनी आहे तेथें गुप्त।।१।।

तेथें दुः खि विप्राघरीं । गुरु शाकभिक्षा करी। घेवडा वेल तोडी करी। ब्राह्मणी करी दुःख तेव्हां।।२।।

तद्दुः ख हरावया । वेलातळीं देई तया । धनकुंभ गुरुराया । म्हणे तया न प्रगटा हें।।३।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. धनकुम्भप्रदानं नाम अष्टोदशोऽध्यायः।।१८।।ग्रं.सं.।।२०३।।

१. चांगले मनोरथ २. तक्षकासह इंद्र.

हो हा सं न्यासी म्हणून । भिक्षा मागे शिव आपण । हिरण्यकशिपुदारण । करितां नखें तापिलीं।।१।।

जो वि ज्ञै कगम्य[१] हरि । तो श्रीदत्त औदुंबरी । शांत होता तयावरी । वास करी श्रीसहित।।२।।

दे मा र्ग कृष्णा तया । द्विपीं राहे, योगिनी तया । भिक्षा देती पूजूनियां । नेणूनियां विप्र म्हणती।।३।।

न स्व च्छं दी गांवी जायी । पाहूं येथे काय खायी । ऐसें म्हणूनी ते ठायीं। राहतां येयी भय त्याला।।४।।

तत्र त्य नर गंगानुज । भावें आला, त्या गुरुराज । दाखवूनी तेथील गुज । देती निजप्रीती वर।।५।।

तो न मू नी त्रिस्थली[२] पुसे । क्षणें गुरु दावितसे । गुरु जाऊं म्हणतसे । दुःख होतसे योगिनीसी।।६।।

न गू[३] ढाः केपि मे चेष्टा । विदुरित्येष पादुके । विन्यस्याश्वास्य ताः प्राप । श्रीगुरुर्गाणगापुरम्।।७।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. योगिनीवरदानं नाम एकोनविंशोऽध्यायः।।१९।।ग्रं. सं.।।२१०।।

ऐसें प रिसुनी विप्र । म्हणे तेथें कोणा वर । लाधला बोला सविस्तर । ऐकें उत्तर सिद्ध म्हणे।।१।।

एक द शग्रंथी विप्र । शिरोळग्रामीं मृतपुत्र[४] । तद्भार्येसी एक विप्र । सांगे उग्रकर्मविपाक।।२।।

त्वां ब्रह् म स्वशत घेतलें । तया पिशाचत्व आलें । त्याणें तुझे सुत मारिले । कर्म[५] केलें पाहिजे त्याचें।।३।।

दे द्र व्य तद्गोत्रासी[६] । सेवी मास एक गुरुसी । येरू म्हणे न मजपाशी । द्रव्य गुरुसी सेवी भावें।।४।।

१. अनुभवज्ञानगम्य २. काशी, प्रयाग व गया ३. आपल्या गूढ चेष्टा कोणालाही कळूं नयेत म्हणून आपल्या पादुका ठेवून योगिनींना आश्वासन देऊन श्रीगुरु गाणगापुरास गेले. ४ मृताः पुत्रा यस्य. ५. क्रिया ६. त्याच्या वंशजांस किंवा त्याच्या गोत्राच्या ब्राह्मणास.

अ भ यं कर रक्षु ऐसें । म्हणूनी सेवितसे । स्वप्नीं भूत मारीतसे । राखीतसे गुरु तिसी।।५।।
सांगे तत् परिहार जसा । जागेपणें करी तसा । तेणें मुक्त जाला पिसा । गुरु प्रसाद दे तिला।।६।।
ती दो न पुत्र प्रसवे । ते दोघे दिसती बरवे । थोर होतां व्रत करावे । म्हणुनी वेंचिती ते द्रव्य।।७।।
श्रेष्ठ त नयाचे व्रत । आरंभितां धनुर्वात । होवोनि तो वांकत । सन्निपात न शमे यत्नें।।८।।
तो त द्भा वें फिरवी नेत्र । मरे होता अर्धरात्र । माता रडे पिटी गात्र । बोधमात्र नायके ती।।९।।
दिव स मध्यान्हीही येतां । जाळाया ती न दे प्रेता । ब्रह्मचारी स्पष्टवक्ता । तेथें येतां झाला तेव्हां।।१०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे. समन्धपरिहारो नाम विंशोऽध्यायः।।२०।।ग्रं.सं.।।२२०।।

तो हो य गुरुनाथ । तियेप्रति सांगें हित । कोण कोणाचा हो सुत । वद ज्ञात असे तर।।१।।
पृथ्व्यप् ते जो वाताकाश । हेच आले आकारास । मायामय संबंधास । तूंचि खास रडशी कीं।।२।।
जरी सू नु तुझा हाचि । पूर्वापार असे साची । सांग कथा प्राग्जन्माची । तूं कोणाची स्त्री कीं माता।।३।।
जैं सू र्यो दयास्तानें । नित्य दिन रात होणें । तेवीं कर्मे जन्ममरणें । भोगणें सुखदुःख।।४।।
कोणी न हें निवारिती । गुणमय ते मरती । देवादिकां हीच गती । मेला मागुती न ये शोकें।।५।।
दे हा श व जाळावया । ती म्हणे जो दे अभया । बाध ये कीं त्याच्या वाक्या । कोण तया पुढें भजे।।६।।
सांगे शां त ब्रह्मचारी । हें जा पूस औदुंबरी । येरी शव बांधुनी उदरीं । पादुकेवरी शिर हाणी।।७।।

बोल को णाचा ऐकेना । लोक गेले स्वसदना । पतिसह ती अंगना । आक्रोशना करीतसे।।८।।

स्वप्नीं न को रडूं म्हणून । स्वामी देती आश्वासन । पाहे जागी होवून । पुत्र संजीवन झाला।।९।।

विप्र पा हांटेस आले । त्यांनी नवल हें ऐकिलें । सर्वा आश्चर्य तें झालें । असें झालें वाणू किती।।१०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे मृतपुत्रसंजीवनं नाम एकविंशोऽध्यायः।।२१।।ग्रं. सं.।।२३०।।

गुरु व से गाणगापुरी । तेथें काय लीला करी । असें विप्रें पुसतां बरी। लीला सारी सांगे सिद्ध।।१।।

मी तों कः पदार्थ येथ । वर्णावया सर्व चरित । होती ब्रह्मादि कुंठित । तेव्हा संक्षिप्त सांगतो।।२।।

अमे[1] य कीर्ती गुरु आले । भीमामरजासंगमी भले । गाणगापुरी राहिले । बैसले अश्वत्थीं ते।।३।।

हो य द्ग त्या गृह पावन । तो विप्रगृही येऊन । वांझमहिषी पाहून । ब्राह्मणस्त्रीते बोले।।४।।

सु स त्वा तूं दे क्षीरपान । ब्राह्मणी बोले वचन । वांझ म्हैस हे दुभे न । गुरु दोहून दावी म्हणे।।५।।

मानू न ती दोही क्षीर । दोन घडे दोहिलें क्षीर । गुरु पिउनी देती वर । हो दारिद्र्य दूर म्हणूनी।।६।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे वन्ध्यामहिषीदोहनं नाम द्वाविंशोऽध्यायः।।२२।।ग्रं. सं.।।२३६।।

१. अपरिमित

ही का नि वार्ता ऐकून । सर्व पुसे नृप येऊन । गुरुमाहात्म्य ऐकून । ससैन्य येऊन प्रार्थी।।१।।

म्हणे व सूनी[१] गांवांत । उद्धरीं आम्हां तूं दैवत । तें मानी गुरुनाथ । पालखींत बसवी भूप।।२।।

न व[२] र्तं ते प्रभुधियः । परतन्त्रास्तथाऽपि हि । भक्तिप्रियो भक्तिगम्यो । भक्ताधीनत्वमेत्यजः[२]।।३।।

भूपें ते व्हां उत्सवून । त्यां आणिलें पालखींतून । अश्वत्थातळीं येऊन । ब्रह्मराक्षसा पहाती।।४।।

तोही त यापदीं लागे । गुरु राक्षसासी सांगे । संगमीं न्हातां तूं वेगें । होसी अंगें येथ मुक्त।।५।।

तो त द्धा मीं पावला । ग्रामीं मठ गुरूला दिल्हा । ऐकूनी गुरूची लीला । निंदी तयांला एक यती।।६।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे ब्रह्मराक्षसोद्धरणं नाम त्रयोविंशोऽध्यायः।।२३।।ग्रं. सं.।।२४२।।

तो कु म सीग्रामीं वसे । तेथ ससैन्य गुरु येतसे । त्रिविक्रमा ध्यानीं दिसे । देव येतसे नदीतीरीं।।१।।

तेथें प ळत ये यती । तया दिसे सैन्य यती । गुरु त्याचा गर्व हरती । त्या दाविती निजरूप।।२।।

तो क र जोडुनी प्रार्थी । गुरु तया गती देती । गाणगापुरी मागुती । गुरु येती सैन्यासह।।३।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे विश्वरूपदर्शनं नाम चतुर्विंशोऽध्यायः।।२४।।ग्रं. सं.।।२४५।।

हो ते मं दधी ब्राह्मण । म्लेंच्छराजापुढें येऊन । सार्थवेद म्हणून । घेती धन उन्मत्त ते।।१।।

म्लेंच्छा म दोन्मत्त विप्र । म्हणती आज्ञा द्यावी क्षिप्र[३] । वादें जिंकू लोकी विप्र । हारिपत्र किंवा घेवू।।२।।

१. राहून २. परमेश्वराच्या बुद्धी परतंत्र असत नाहींत तथापि परमेश्वर भक्तिप्रिय असल्यामुळें भक्तांच्या आधीन होतो.३. त्वरित.

राव म हा नंदें देत । आज्ञा, बसवी पालखींत । विप्र राजे म्हणवीत । भूमी जिंकीत येती तेथ।।३।।

ते कु म सी मध्ये यती । त्रिविक्रमभारती । त्रिवेदी जाणुनियां येती । त्या म्हणती वाद करी।।४।।

जरी मै त्र द्विज असे । तरी करील कीं असें । कुबुद्धि हे विप्र जसे । हरती तसें करावें।।५।।

यांची वां छा गुरु पुरवील।असें म्हणोनी त्यां तत्काल।यती आणवी गुरूजवळ।सांगे सकळ त्रिविक्रम।।६।।

वाद्यां शो धीत हे आले । यांणी माझें न ऐकिले । मग येथे आणिले । यां शिक्षिले पाहिजेत।।७।।

गुरु जी म्हणती तयां । नेणो आम्ही जयाऽजया । वाद आम्हां कासया । तुम्हीं वायां मरूं नका।।८।।

विप्र व चन बोलती । तुम्हां काय विद्या येती । तें ऐकुनि गुरु म्हणती । गर्व किती करितां हा।।९।।

गर्वें लो कीं किती मेले । बाण रावण खपले । व्यर्थ कौरवादि मेले । आरंभिलें काय हें तुम्हीं।।१०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे उन्मत्तद्विजाख्यानं नाम पञ्चविंशोऽध्यायः।।२५।।ग्रं. सं.।।२५५।।

वेद के वळ म्हणावया । हो सायास ऋषिवर्या । कलियुगीं अल्पायुष्यां । केवीं आम्नायांतीं[1] गती।।१।।

चिरं जी व भरद्वाज । ब्रह्मा पुसे वेदगुज । तीन राशी दावी अज[2] । ऋषी लाजला तेधवां।।२।।

दे दे व मुष्टी तीन । न तया आले अजून । हे अनंत वेद जाण । विभागून ठेविले तूर्त।।३।।

विष्णू भू तळीं व्यासरूपी । चौशिष्यां चार निरूपी । वेदशाखा विभागरूपी । पैला निरूपी ऋग्वेद।।४।।

शुद्धां तः करणें पैला । ऐक सांगों ऋग्वेदाला । व्यरत्निमात्र रूप त्याला । व्यक्तगळा दीर्घदृष्टी।।५।।

रवि स मान कांति ज्याची। अत्रिगोत्र देवता ज्याची। ब्रह्मा गायत्री छंदची । आयुर्वेदचि उपवेद।।६।।

१. सर्व वेद २. ब्रह्मदेव

शाखा ना में भेद पांच । सहा अंगें ब्राह्मणच । अरणेंशीं हो वेदच । पैलासच व्यास सांगे।।७।।

शिष्य त याचा दुसरा । वैशंपायन नामें बरा । तया यजुर्वेद दुसरा । सांगे बरा विभागून।।८।।

सुम नः प्रीती जो यजनें । करी पंचारत्नी मानें । भारद्वाज गोत्र जाणें । कृशपणें त्रिष्टुप्छंद।।९।।

दैव म हा विष्णु ज्याचें । उपवेद धनु ज्याचें । सूर्याभ जो भेद त्याचें । जाण साचे श्याऐशींच।।१०।।

सुम नः प्रीती दे स्तवनें । सामवेद अभिधानें । षडरत्निमितमानें । जैमिनीनें घेतला हा।।११।।

विशे ष हा शांत दांत । असे चर्मदंडहस्त । गोत्र काश्यप दैवत । रुद्रख्यात जगतीछंद।।१२।।

जो ओ ष्ठा रक्त असे । याच्या भेदां मिती नसे । ज्याचा उपवेद असे । गंधर्व असें सांगे व्यास।।१३।।

भुव नीं सांग भेद याचे । कोण बोलेल वाचे । सांगोपांग वदतां वाचे । शेषाचेही ये शीण।।१४।।

अतीं द्रि य ज्ञाता व्यास । ऐक म्हणे सुमंतूस । सांगे अथर्ववेदास । हो देवेश देव त्याचा।।१५।।

असे या चा उपवेद । अस्त्र वेद तिसरा छंद । गोत्र बैजान स्वच्छंद । नऊ भेद कल्प पांच।।१६।।

हे को णि चारही पूर्ण । एवढे न जाणिले जाण । एक शाखा ही अपूर्ण । तुम्हीं पढून सर्वज्ञ कीं।।१७।।

जे वि प्र धर्मयुक्त । विष्णु मानी त्यां दैवत । वेदबळें हस्तगत । तयां होत देवादिक।।१८।।

जे स्व कृ त्या सोडुनी देती । म्लेंच्छापुढें वेद पढती । ब्राह्मणातें जिंकिती । ते होती ब्रह्मराक्षस।।१९।।

वद ति असें गुरु तरी । ते म्हणती वाद करी । जयपत्र द्या नातरी । आमुची थोरवी न राहे।।२०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे चतुर्वेदकथनं नाम षड्‌विंशोऽध्यायः।।२६।।ग्रं. सं.।।२७५।।

हूं, आ स्था पूर्ण करूं । असें म्हणून श्रीगुरु । दूर पाहती मांग नरू । शिष्या निरूपिती आणाया।।१।।
जाऊ नि शिष्यें तया । आणिती गुरुराया । सात रेखा काढूनियां । आणिती तयां वरी तया।।२।।
तो ए क एक लंघिता । सांगे सप्तजन्मवार्ता । अंतीं विद्वद्‌द्विज म्हणतां । जिंक विप्रा म्हणती गुरु।।३।।
साम र्ष तो पुढें होतां । ये त्यां विप्रां मूढता । द्वादशाब्द राक्षसता । ये मुक्तता त्यानंतर।।४।।
दुर्ग ति त्यां अनुतापानें । ये स्वल्प गुरुकृपेनें । विप्र होवुनि मांगानें । गा-हाणें गुरूसी केलें।।५।।
सद्वं श ज द्विज असून । केंवि झालो जातिहीन । हें सांगा विस्तारून । तें ऐकून गुरु सांगे।।६।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे द्विजगर्वपरिहारो नाम सप्तविंशोऽध्यायः।।२७।।ग्रं. सं.।।२८१।।

जो दू री त्यजि धर्मास । मायबापदेवगुरूस । निर्दोष स्त्रीपुत्रास । चोर असत्यवादी जो।।१।।
जो नि रं तर अशुद्ध । हरिहरां करी भेद । हो पाखंड दुर्वाद । पंक्तिभेद करी खळ।।२।।
मारी य त्नें जीवा क्रूर । जाळी वनग्रामघर । विकी कन्या गोरस मंत्र । फिरवी विप्रअतिथीतें।।३।।
जो निं द क श्राद्धातें । न करी फोडी कूपातें । तोडीं मार्गाश्रयवृक्षातें । जेवी व्रतातें सोडून।।४।।
जो दि वा पर्वणीं स्त्रीशीं । भोगी रमे परस्त्रीसी । करी विश्वासघातासी । दत्तदानासी घे पुनः।।५।।
जो स्व प्नो पम सुखार्थ । मारणादि करी व्यर्थ । परतापी करी अनर्थ । नाडी नेणत दे औषध।।६।।
तो प ति त होयी मांग । जो करी वृषलीसंग । करी स्नान संध्या त्याग । पंचयाग टाकून जेवी।।७।।
जो हो य वृत्तिरत्नहर्ता । दुष्प्रतिग्रही दुर्भोक्ता । मद्य पीता ये हीनता । अनुतप्ता दोष थोडा।।८।।

जो लु च्चा जिती विप्रांस । हूं तूं करी पितृगुरूंस । तो होयी ब्रह्मराक्षस । हो वायस निर्मंत्राशी।।९।।
तो क प्यु दरीं जन्म घे । चोरूनी जो फळपत्र घे । जो धन चोरूनी घे । जन्म घे तो उंटाचें।।१०।।
हो उ त्क्रा न्ती नंतर । नरकवास घोर । ह्या योनी त्या नंतर । दंभकर बगळा हो।।११।।
माशी म धुहर उंदीर । धान्यहर जळहर । चातक पशु तृणहर । स्वर्णहर कृमिकीट।।१२।।
दुर्ग ती आधीं भोगून । होता पुण्यपाप समान । अंधपंग्वाद्यघचिन्ह । ये घेऊन येथें पुनः।।१३।।
कृमी श्व खर जारकर्में । स्त्री नरां गती हे दुष्कर्में । जे वागती सत्कर्में । स्वघर्में तरती ते।।१४।।
हो प रः स्पर दंपती । दोषी ऐसें गुरु बोलती । पुसे त्रिविक्रम निष्कृती । सांगती गुरु तया।।१५।।
तरी गृ हीत ब्रह्मदंड । शरण विप्रा पापखंड । हो, होतां पाप उदंड । कृच्छ्र मुंडपूर्वक कीजे।।१६।।
शक्ति ही नें गोधन द्यावें । जप यात्रा होम करावे । शक्तें चांद्रायण करावें । गव्य प्यावें अनुतापें।।१७।।
स्वात्म त्वै श्वर्ययुक्त । गुरु वारी सर्व दुरित । पितृत्यागें हो पतित । होती पूत मासस्नानें।।१८।।
पति ता नें तें ऐकून । म्हटलें मी झालों पावन । घ्या विप्रांत मेळवून । तें ऐकून गुरु म्हणे।।१९।।
होऊ नि नृप विश्वामित्र । सायासें झाला पवित्र । तूं हीन वेदापात्र । ये परत्र विप्रकुळीं।।२०।।
तो आ सं न येतां स्त्रीला। स्पर्श भयें मारूं आला। गुरु म्हणे त्यजीं न स्त्रीला। तो म्हणाला हीन होऊं की।।२१।।
ते त या अंगींची विभूती। लुब्धाहातीं धुवविती।ज्ञान जाऊनी त्या ये भ्रांति। घराप्रति गेला सस्त्रीक।।२२।।
प्रण ति करी त्रिविक्रम। म्हणे वारा माझा भ्रम। अंग धूतां ज्ञान उत्तम। जाऊनी भ्रम त्या हो केंवी।।२३।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे कर्मविपाककथनं नाम अष्टाविंशोऽध्यायः।।२८।।ग्रं. सं.।।३०४।।

बर वा प्रश्न ऐकून । गुरु म्हणे भस्में ज्ञान । दिधले तें धूतां जाण । जाऊन हो अज्ञानी।।१।।

पूर्व यु गीं वामदेव । क्रौंचवनीं घेयी ठाव । त्या पाहुनि घेयी धांव । दुर्भाव तो राक्षस।।२।।

तो दु र्गं धांगीं तेव्हां । धरी भक्षूं वामदेवा । भस्म लागतां दुर्भावा । त्यजुनि भवा पूर्वा स्मरे।।३।।

तृट्क्षु धा शांत झाली । म्हणे पंचवीस आपुलीं । स्पष्ट जन्में म्यां स्मरलीं । भूपकुलीं मी दुर्जय।।४।।

धरू नि मी भोगी स्त्रिया । राज्यमदें करूनियां । चारी वर्णांच्याही भार्या । भोगी वेश्या असंख्यात।।५।।

अवि वा हितांसी भोगीं । रजस्वलाही न त्यागीं । पुढें दैवें झालों रोगी । शत्रु वेगीं घेती राज्य।।६।।

दुरा श यें पाप केलें । स्त्रियांनी बहु शापिलें । क्षयरोगें ग्रासियलें । अंती आले यमदूत।।७।।

अप यात् क्षय आयुषः । हे कळलें निर्दोष । मी मरतां यमपुरुष । न्हेती दोष क्षाळावया।।८।।

भी दे श्रो त्रा यातना ती । पित्रांसह भोगुनी अंती । अंगी शिश्ने हजार होतीं । प्रेतगती ती ये मला।।९।।

तें गा त्र ही सोडूनी । मी चोवीस भोगीं योनी । ब्रह्मराक्षस होऊनी । राहें वनीं सदा भुका।।१०।।

ह्या प ञ्च विसाव्या जन्मीं। गजा खातांही भुका मी। स्पर्शमात्रें शांती तुम्हीं। दिल्ही तुम्ही साक्षाद्देव।।११।।

गेले क्षु त्पिपासादि । याचा हेतू सांगा आधीं । वामदेव म्हणे शुद्धी । झाली, आधी गेला भस्मे।।१२।।

भस्म स्प र्शें एक जाण । द्राविड जार ब्राह्मण । त्याजिला शूद्रें मारून । ये श्वान त्यावरि एक।।१३।।

श्वस्प र्श नें तदंगस्थ । भस्म लागुनी झाला मृत । त्यातें न्हेती यमदूत । शिवदूत सोडविती।।१४।।

त्या सा नं दें कैलासातें । न्हेतां यम आला त्यातें । धर्म सांगून विप्रातें । दूत न्हेते झाले तया।।१५।।

शंभु च जाणे तन्माहात्म्या। भस्म लावीं मीं सर्वकाया। लागलें किंचित् तुझ्या काया। ज्ञान तयायोगें हो हें।।१६।।

वदे र क्ष राज्य करितां। वापी केल्या निर्जळपंथा। विप्रां वृत्ति दिधल्या आतां।आलें हातां त्यांचे फळ।।१७।।
सांगे स विस्तर मला । भस्मधारण विधीला । वामदेव म्हणे शिवाला । प्रश्न केला हा कुमारें।।१८।।
मग नं दीगौरीयुक्त । शिव वसे देवांसहित । सनत्कुमार वंदुनी तेथ । करीतसे हा प्रश्न।।१९।।
भो व्या घ्रा जिनवास । चतुर्विध पुमर्थांस । देई शीघ्र असें आम्हांस । सांगा खास स्वल्प साधन।।२०।।
त्यां म्ह ण तसे ईश । धारण करीं भस्मास । चतुर्विध पुमर्थांस । हे, हें खास सुसाधन।।२१।।
न ग मे ऐसें सुसाधन । गोमयें अग्निहोत्रांतून । भस्म घेइ करीं धारण । भ्रूसमान त्रिपुंड्रेंसी।।२२।।
हो न व देवादिक । एकाएका पुंड्रीं देख । मध्यांगुष्ठानामिका । काढीं रेखा शीर्षादिकीं।।२३।।
हो हें च पापशमन । असें वामदेव सांगून । करवी भस्मधारण । उद्धरून गेला राक्षस।।२४।।
गुरु अ सें सांगती । सर्व आनंदित होती । गेला त्रिविक्रमयती । कथा पुढती सांगों ऐक।।२५।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे भस्ममहिमावर्णनं नाम एकोनत्रिंशोऽध्यायः।।२९।।ग्रं. सं.।।३२९।।

दत्ता धि ष्ठित माहोर । तेथें गोपीनाथ विप्र । तया होऊनी मेले पुत्र । दत्तवर वांचवी एक।।१।।
ते नि ष्ठा दत्तावर । ठेऊनी करिती संस्कार । त्याचा विवाह केला थोर । हर्षें सादर मायबापें।।२।।
त्यां हो य रूप समान । साजे जोडें देवासमान । पतिसेवेवांचून । सतीमन न विसंबे।।३।।
सून म हा पतिव्रता । तयां हर्ष हो पाहतां । तंव आली दुर्दैवता । रोग सुता त्या हो असाध्य।।४।।

होऊ न क्षयरोग । क्षीण झालें पतीचें अंग । जेवीना तो तसी चांग । सती हो रोग नसतांही।।५।।

हो प श्चा त्ताप द्विजाला । व्यर्थ वरिली सुभगेला । म्हणे तुझा भोग सरला । माहेराला जाई सुखें।।६।।

ती भ यं कर वाचा । ऐकून म्हणे तुमचा । जेथ देह तेथ हा साचा । असे तुमचा अर्धात्मा हा।।७।।

नसो वि योग म्हणून । सासुसास-या प्रार्थून । धवा घेऊन डोळींतून । ये गाणगाभुवना।।८।।

त्रिदो ष वाढुनी जाण । द्विज झाला गतप्राण । सती उठे द्याया प्राण । निवारण करी जन।।९।।

ती त या चे आठवी गुण । रडे शीर्ष आपटून । म्हणे रुसे गौरीरमण । कोण चोरून ने सौभाग्या।।१०।।

जैं धे नु जातां शरण । राखुनि घे यवन प्राण । भेटूं जातां देवा पडून । टाकी चुरून देऊळ कीं।।११।।

तेणें प री झालें मज। देवा शरण येतां आज। न राखसीं माझी लाज। देवा तुज कींव न ये की।।१२।।

ती अ से करी विलाप । तंव आला आपोआप । तो दिनांचा मायबाप । गुरु रूप पालटोन।।१३।।

तीसि व दे कां रडसीं । जीव ये कीं रडता यासी । मायामय संबंधासी। व्यर्थ म्हणसी पति मेला।।१४।।

देव ते ही काळाधीन। तुम्ही तरी मर्त्य जाण। पाहूं जातां विचारून। मेला कोण, कोण जन्मला।।१५।।

देह उ त्पन्न होऊन । मरे त्याहून विलक्षण । आत्मा नित्य विकारहीन । संबंधी न कवणाचा तो।।१६।।

त्या उ त्क्रा न्ती व्यापका कैंची।वार्ता न त्या संबंधाची। नदीकाष्ठवत् हो देहांची।भेटी हेंची कर्मयोगें।।१७।।

ह्या अ मं गळ देहाच्या । तादात्म्यें भ्रम कर्मांचा । गुणमूल अज्ञानाचा । हो की साचा परिणाम।।१८।।

तू अ तं द्रित होऊन । दे हा संबंध सोडून । जेणें जासी उद्धरून । तें साधून घेइ शीघ्र।।१९।।

रक्ता स्थि मांसा न रडे । हें ऐकून ती पायां पडे। म्हणे बापा शोकीं पडे। काढा कडे सोयरे तुम्हीं।।२०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे प्रेताङ्गनाशोको नाम त्रिंशोऽध्यायः।।३०।।ग्रं. सं.।।३४९।।

म्हणें तं द्रि[1] सोडूनी ऐक। वाढे विंध व्यापी अर्क। तेव्हां जाती वृंदारक[2]। काशीमध्यें तद्‌गुरुपाशीं।।१।।
स्तवि वा क्पति[3] अगस्त्यातें । लोपामुद्रा साध्वीतें । त्वत्सम नान्या पतिव्रते । पतिदेवते तूं धन्या।।२।।
कदा पि न स्वतंत्रता । पतिसेवननिरता । छायेपरी - पतिदेवता । पतिव्रता ती परिचिता।।३।।
जेवी भुं जीतां पति । पतिपूर्वी स्नान करी ती । उठे आधीं निजे ऊपरांतीं । न बसे ती पतिपुढें।।४।।
जी न जा य घराबाहेर । करी पत्युच्छिष्टाहार । पतिवचनीं जी सादर । निरंतर अनुकूल।।५।।
जी आ नं दे दैवलाभें । वस्त्रभूषणीं न क्षोभें । धर्म सोडिना देहलोभें । ती शोभे निजधर्मे।।६।।
न घे वा र्ता श्रीमंताची । मर्यादा धरी वडिलांची । स्वातंत्र्य ती व्रताची । आशा साची नच करी।।७।।
देव गु रु सर्व पती । मानुनि वाद न करिती । पतिसवें ज्या भांडती । भालु होती भुंकती त्या।।८।।
न को णा सीं भेद कीजे । धवा वंचुनी खाइजे । वृक्षीं लोंबे वागुळी जे । खायी निजमळमूत्र।।९।।
धर्मा न्वि त राहतां । दैवें पति मरतां । सवें जाय पतिव्रता । न वियुक्ता छायेपरी।।१०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे पतिव्रताधर्मनिरूपणं नाम एकत्रिंशोऽध्यायः।।३१।।ग्रं. सं.।।३५९।।

१. आळस २. देव ३. बृहस्पति

पर तं त्र न रहावे । धवासवें सतीनें जावे । पदोपदी मेधफल[1] घ्यावे । स्थान घ्यावे पतिलोकीं।।१।।

किंवा वि धवा धर्म । पाळितां हा ये शर्म[2] । पोर असतां कीजे भर्म[3] । राहिजे ब्रह्मचा-यापरी।।२।।

स्वल्प मू लही असतां । पोटीं गर्भ असतां । पतिशव न मिळतां । सवें जातां दोष असे।।३।।

ज्या मू ढा केश राखती । धवासह त्यां हो दुर्गती । अतएव मरतां पति । करो ती केशवपन।।४।।

शय ना तें खाटेंवरी । जी करी जाय ती नारी । नरकीं यास्तव भूमीवरी । निजो नारी एकाहारा।।५।।

भूषा नु लेप तांबूल । त्यजूनी राखिजे शील । नेसावें शुभ्रचैल[4] । मंगलस्नान वर्जावें।।६।।

विष्णु प तिसम मानून । कीजे वैधव्य आचरण । न कीजे नरवीक्षण । चांद्रायण शक्त्या कीजे।।७।।

अव श्यं भावि होइजे । त्याचा शोक नच कीजे । मासव्रत पाळिजें । माघ ऊर्ज[5] वैशाखीं हो।।८।।

सुम ति जी वागे ऐसी । सहगमनवत् फल तीसी । जायी घेउनी पतिसी । स्वर्गी ऐसी गुरूक्ती हें।।९।।

म्हणे प तिव्रता मातें । वैधव्य हें न रुचतें । तारुण्य हें विघ्नातें । देई असें मातें वाटे।।१०।।

अव श्यं कुरु ऐसें । बोलुनी तो देतसे । चार अक्ष[6] भस्म परिसें । म्हणतसे त्या सतीतें।।११।।

हे भू[7] ति शिरीं लावून । पतिकर्णी अक्ष बांधून । गुरुदर्शन घेऊन । सहगमन करीं मग।।१२।।

तो आ ज्ञा अशी देऊन । गेला, साध्वी दानें देऊन । पतिशवा नेववून । अग्नि घेऊन पुढें चाले।।१३।।

पाहू न नारी म्हणती । केश साडेतीन कोटी । होमूनि स्वर्गी घेती । वर्षकोटी प्रतिकेशा।।१४।।

सर्व च मत्कार पाहाती। स्मशानी ये मंदगती। अग्नि सिद्ध करोनी ती। आठवी चित्तीं उपदेशा।।१५।।

१. यज्ञफल २. सुख ३. पोषण. ४. वस्त्र ५. कार्तिक ६. रुद्राक्ष ७. भस्म

स्व च क्षु नें गुरु पाहून । म्हणे सहगमन करीन । विप्रें शीघ्र ये म्हणून । वदतां मनस्विनी गेली।।१६।।

जैं उ षः काळी[1] विजन[2] । गजबजती जैसे, जन । सवें येती गजबजून । गुरुस्तवन मार्गी करी।।१७।।

सती य तीशा पाहून । करी साष्टांग नमन । पञ्चपुत्रा हो म्हणून । आशीर्वचन दे गुरु।।१८।।

हें स्व तं त्र बोलता जन । देती साद्यंत सांगून । गुरु प्रेता आणवून । करी स्नपन रुद्रतीर्थे।।१९।।

तंव तो उठोनि बैसला। नग्न म्हणूनी लाजला। सर्व लोकां हर्ष झाला। न मावला साध्वी देहीं।।२०।।

दैव यो गें स्वर्णघट । रंका मिळतां अवचट । हर्ष हो तेंवी तिला स्पष्ट । उत्कट हो हर्ष तेव्हां।।२१।।

प्रेम गि रा दोघें स्तविती । श्रीगुरु वर देती । गेले दोष ये सद्गती । लोहां गती जेंवी परिसें।।२२।।

लिही न याला विधी लेख। धूर्त पुसे गुरु म्हणे ऐक। पुढचा शतायुष लेख।दिल्हा सम्यक् मागून मी।।२३।।

मन[3] श्चै त्य गुरु असे बोले। लोकीं जय शब्द केले। दंपतीनें स्नान केलें।मठीं आलें गुरु त्यांसह।।२४।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे प्रेतसंजीवन नाम द्वात्रिंशोऽध्यायः।।३२।।ग्रं. सं.।।३८३।।

ती आ नं द भावें नमुनि। म्हणे काल भेटला मुनि। गुरु बोले हांसोनी। पालटोनी रूप मी आलो।।१।।

तुझें प र प्रेम पाहिले। रूद्राक्ष मींच दिल्हे। रुद्रतीर्थे वांचविले । ऐक बाले नवल हें।।२।।

अव श्यं हे ल्यावे सादर। पूर्वी काश्मीरेशकुमार। प्रधानाचाही कुमार । अलंकार टाकून देत।।३।।

त्यां भ्रां त्या पिसे म्हणती । भस्मरुद्राक्षातें धरिती । पराशर पुसे नृपति । हेतू वदती मुनी भूपा।।४।।

१. पहांटेस २. पक्षी समूह. ३.उपलक्षण मन आदिकरणाचा प्रेरक

सर्वा त्म शिवा हे भजती । नंदिग्रामीं वेश्या सती । वैश्यरूपें गौरीपती । ये तीप्रती वळखावया।।५।।
अन न्य स्त्री त्र्यह[1] होवून।रतिदानें घे लिंग कंकण।तो बोले लिंगनाशन।होतां प्राण त्यजीन मी।।६।।
त्याच्या व चना मानून । मंडपीं ठेवी लिंगरत्न । रमे वेश्या गृहीं नेऊन । जळे लिंगासह मंडप।।७।।
वेश्या स्थि रवून मन । लिंग जळालें पाहून । करी अग्निप्रवेशन । सर्व दान देई वेश्या।।८।।
निघे तं व लोक म्हणती। वेश्येघरी किती येती। कोणाची तूं कशी सती। नायकतां ती आग रिघे।।९।।
तैं हो य शिव प्रसन्न। तिला नेयी उद्धरून। तिणे जे रुद्राक्ष ल्येवून। कुक्कुट मर्कट पाळिले।।१०।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे रुद्राक्षमहिमावर्णनं नाम त्रयस्त्रिंशोऽध्यायः।।३३।।ग्रं. सं.।।३९३।।

ते हो ते हे अक्षप्रिय । भूप म्हणे वदा भविष्य । मुनि म्हणे सप्ताहायुष्य । तुझा तनय असे तरी।।१।।
वेदा न्तो पनिषत्सारा । रुद्रा विधी दे मुनीश्वरां । करी अधर्मसंहारा । यमपुरा वोस करी।।२।।
तज्ज्ञा प्य नु भवा यम । कथी तया म्हणे ब्रह्मा । अभाविका हो अधर्म । भाविका शर्म दे हा रुद्र।।३।।
मृत्यु कृ तभय जाया । रुद्रे अर्ची मृत्युंजया । मग रुद्राभिषेक राया । द्विजवर्यांकरवी करी।।४।।
त्या सु ता सातवे दिनी । मृत्यु येतां तीर्थें मुनी । प्रोक्षी, शिवदूतें येऊनी । मृत्युदूतां पळविले।।५।।
धर्मा त्मा जो यम त्याप्रती । ते जाउनी सांगती । यम पुसे शैवांप्रती । ते म्हणती लेख पहा।।६।।

१. तीन दिवस

तें मा नो नी चित्रगुप्ता । करवीं लेख पाहतां । यम हो भ्रांत, शिवदूता । क्षमा मागता जाहला।।७।।

गेलें नै मित्तिकारिष्ट । नृप विप्रां करी तुष्ट । तों नारद तें अदृष्ट । सांगे स्पष्ट ऋष्युपकार।।८।।

महा नं द सर्वां झाला । अयुतायु सुत जाहला । गुरु सांगे सतीला । ती गुरूला प्रार्थुनी म्हणे।।९।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे रुद्राभिषेकफलकथनं नाम चतुस्त्रिंशोऽध्यायः।।३४।।ग्रं. सं.।।४०२।।

मंत्रो प देश द्या मला। तेणें नित्य स्मरूं तुम्हाला। गुरु म्हणे स्त्री मंत्राला। पात्र न, तिला पतिसेवा।।१।।

अव श्य ऐकें ही कथा । देवीं दैत्यां रणीं मारितां। तयां संजीवनी जपतां। वांचवितां होय भार्गव।।२।।

अचि न्त्य मंत्रविद्याशक्ति । इंद्र सांगे शिवाप्रती । आणवून शुक्रापती । उमापती भक्षितसे।।३।।

तो त्या चे मूत्रद्वारा । पडे वांचवी पुनः क्रूरां[1]। बृहस्पती म्हणे इंद्रा । बूडवूं मंत्र षट्कर्णेशी।।४।।

असें त या बोलून । स्वसुता कचा दे धाडून । कपटी शिष्य होवून । शुक्रा सेवून तो राहे।।५।।

न वा सः शुभदो नोऽस्य[2] । असें मानुनी दैत्य । मारिती त्या वांचवी काव्य । द्विवार कन्यास्नेहें।।६।।

दैत्य य त्नें त्या जाळून । त्याचे भस्म मद्यांतून । देतीं शुक्र पी नेणून । मग कन्या विरहें रडे।।७।।

शुक्र दा ही दिशा देखे । शेखीं कचा पोटीं देखें । म्हणे देवयानी ऐकें । त्या आणितां मी मरेन।।८।।

कन्या दि व्यमंत्र मागे । म्हणें कचा वाचवीं वेगें । मग मी तूतें मंत्रयोगें । बापा वेगें वांचवीन।।९।।

१. क्रूर स्वभावाच्या दैत्याना २. हा येथे राहणे आम्हाला शुभ नव्हे.

देहा त्य जीन मी अन्यथा। अशी कन्योक्ति ऐकतां। आश्वासुनी मोहें पिता। मंत्र देता झाला तिला।।१०।।
तो म ग जपे कचार्थ । तो ये त्याचें फोडुनि पोट । कन्या ताता उठवीत । कचा श्रुत झाला मंत्र।।११।।
मंत्र तं त्र प्रगट होतां । तत्काळ ये निर्वीर्यता । शुक्रमंत्रा ये हीनता । आज्ञा घेता झाला कच।।१२।।
कन्या ते व्हां वरी म्हणे। विद्या देऊनी दिल्हें जिणें। तूं भगिनी कच म्हणे। ती म्हणे विद्या विसर तूं।।१३।।
कच जो रानें वदे तिला । विप्रावेगळा वरो तुला। शुक्र उपदेशी स्त्रीला। भ्रष्ट झाला मंत्र त्याचा।।१४।।
ती द्वि ज पुत्री असतां। शापें झाली ययातिकांता । दोघां हानी मंत्र देतां । स्त्रिये व्रता आचरावें।।१५।।
ती म ग म्हणें नाथा । व्रत एक सांगा आतां । गुरु म्हणे सोमव्रता । करितां सर्व सिद्धि होय।।१६।।
हें स द्भा वें करी परम । आर्यावर्ती चित्रवर्म । तया सीमंतिनीनाम । हो उत्तम कन्यारत्न।।१७।।
तिये स चौदा वर्षे होता । ये वैधव्य हें कळतां । तिनें मैत्रेयी प्रार्थितां । सोमव्रता ती सांगे।।१८।।
निश्च य मनीं धरून । सोमवारीं उपोषण । किंवा नक्तभोजन । करिजे अर्चून गौरीशा।।१९।।
दुरि ते ही नाशा जाती । सौभाग्य, सुत, राज्याप्ती । दे शीघ्र गौरीपती । अर्चितां त्या प्रदोषीं।।२०।।
हो दुः खि त तरी व्रता । न सोडिजे सर्वथा । सीमंतिनी तें ऐकतां । करी व्रता दृढचित्तें।।२१।।
दैवा लं घी कैसा कोण । चित्रांगदा ती देऊन । राजा गेंही प्रेमें करून। घे ठेवून त्या जामाता।।२२।।
बुडे य मुनेंत जामाता। कन्या प्राण त्यजूं उठतां। वारुनि घरा न्हे पिता। तरी व्रता ती न सोडी।।२३।।
मह च्च क्र काळाचें हें। कोणाचेनी दूर नोहे। तीचा श्वशुर शोकीं स्नेहें। त्या बांधून घे शत्रु राज्य।।२४।।
त्या इ न्द्र सेनसुता । पाताळीं न्हेति राजसुता । जीववुनी वासुकी वार्ता । पुसे, सर्व सांगे तया।।२५।।

तया म ग सर्पनाथ । म्हणे तुझें कोण दैवत । येरु म्हणे गौरीनाथ । मद्दैवत जगदीश।।२६।।
तो त्या सि राहे म्हणे । चंद्रांगद पाठवा म्हणे । मद्विरहे माता शिणे । पत्नीं जिणें वेंचीलची।।२७।।
तो ह य सर्पा सवें धाडी। वेगें आला यमुनाथडी। तेथ सीमंतिनी खडी। पाहतां वेडी हो तयासी।।२८।।
हो स च्चा कीं हा मत्पति । ऐसें जंव चिंती चित्तीं । तों येवून तो पुढती । वार्ता तिची पुसे तो।।२९।।
संल ग्रौ दासीन्यदीना। कोण ही ऐसें पुसतां खुणा। लाजुनी म्हणे सखीजनां। सर्व खुणा तुम्ही वदा।।३०।।
सखी त या सर्व सांगे । तो वदे ईचा पती वेगें । भेटेल हें न वाउगें । आण घे शंकराची।।३१।।
स्वस त्ते नें सोडवी ताता। मायबापांची हरी चिंता। सीमंतीनीसी भेटतां। झाला व्रताच्या प्रभावें।।३२।।
भला जो डा तो शोभला। येऊनी राज्यीं आरूढला। असें व्रतें दे शिव भोला। फल तिला गुरु म्हणे।।३३।।
हें सा वि त्री व्रत तूं करीं। तथा म्हणुनी ती स्वीकारी। निरोपें ये स्वमंदिरीं। धवासह नारी भेटे स्वकां।।३४।।
सुबु द्धि हो त्या दोघांची। जसी वाचा श्रीगुरुची। फलप्राप्ती तसी हो साची। तैं दुःखाची कैंची वार्ता।।३५।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे सीमन्तिन्याख्यानकथनं नाम पञ्चत्रिंशोऽध्यायः।।३५।।ग्रं. सं.।।४३७।।

त्या ग्रा मा मध्यें एक। विप्र एक होता रंक। भावें करी आन्हिक। हो विवेकशून्यता तत्स्त्री।।१।।
तो ने म धरूनी परान्न। सोडी, दंपती भोजन। द्याया आला महाजन। स्त्री जाऊन प्रार्थी गुरूसी।।२।।
हो ता कं ठ भरूनि दीन । गुरु विप्रा बोलावून । म्हणे इला जा घेऊन । तूं परान्न जेवाया।।३।।

तिचें गा -हाणें ऐकून । तिच्या पतीस जा म्हणून । गुरु सांगे तो मानून । तिला घेऊन गेला तो।।४।।
तेथें मा निनी जेवतां । श्वसूकरोच्छिष्ट देतां । उठे पतीसह दुश्चित्ता । गुरुनाथा भेटती दोघे।।५।।
नारी वि नवी क्षमापून । गुरु म्हणे धालें कीं मन । द्विज म्हणे नेम टाळून । भ्रष्ट होऊन गेलों मी।।६।।
अव श्य ही वैरीण । गुरु म्हणे पुरे शीण । मी माया दावून । केले मन शुद्ध इचें।।७।।
ही न च इच्छिल आतां। सोडील परान्नाची वार्ता। न मोडली तुझी निष्ठा। द्विज अडता घे परान्न।।८।।
प्रार्थी भू सुर कोठें जावें । अन्न कोणाचे वर्जावें । गुरु म्हणें जेवावें । स्वसंबंधिगुरुमित्रान्न।।९।।
वर्जी ता मस कुचरान्न । विधिनिषेधरहितान्न । दुष्प्रतिग्रह दुर्भक्ष्यान्न । कन्यान्न सुत न होतां।।१०।।
त्यजीं नि न्दकादिकान्न । जेवितांही श्राद्धान्न । षट् प्राणायाम् शोधन । प्रेतान्न सर्वथा वर्जी।।११।।
अग्ना धा नीभागवतान्न। पवित्र करी ब्रह्मिष्ठान्न। तीर्थी क्षेत्रीं पर्वणीं दान। हीनदान कुदान न घे।।१२।।
स्वाचा र युक्त नर। सर्व दोष करी दूर । द्विज म्हणे सविस्तर। नित्याचार स्पष्ट सांगा।।१३।।
गुरु या परी प्रार्थितां । सांगे पराशरमता । उठा ब्राह्ममुहूर्तास । गुरुदेवतांदिकां वंदा।।१४।।
व्हा या म्य मुख निशीं ऐक । दिवा संधी उदङ्मुख । नैर्ऋत्यकोणी देख । मार्गोदकवर्जितदेशीं।।१५।।
त्यजीं ह रित्तृण, शिरीं । वस्त्रधरी जलदूरीं । मलमूत्रोत्सर्ग करीं । शौच करीं मृत्तोयानें।।१६।।
गोळ्या मो ठ्या आंवळ्यापरी। लिंगीं एक त्रि गुदावरी। सात सात पादकरीं। निम्मीं रात्रीं संकटीं अर्ध।।१७।।
हा द्वि ज वर्याचार । वर्णी वनी यतीश्वर । द्वित्रिचतुर्गुणाचार । स्त्रीकुमारां दुर्गंधान्त।।१८।।

हो त सा च विधी शूद्रा । विप्रें कीजे चूळ बारा । आठ सहा चार इतरां । अंतीं द्विराचमनें शुद्धी।।१९।।

मृदा पु ण्य मध्यस्नान। प्रातःकाळीं गोमयस्नान। व्रती संन्यासी त्रिस्नान। सुभगे शिरःस्नान न नित्य।।२०।।

शीतो ष्णा म्बु गृहस्थासी । मार्जनादि न तयासी। तर्पणादि बहिःस्नानासी। कीजे शिरसीं मृद्धारण।।२१।।

अना मि कीं दर्भ पवित्र । बद्धशिख सोपवस्त्र । संध्या करा जो प्रकार । गृह्यकार वदे जैसा।।२२।।

मौंजी चौ लादिकीं न भस्म । तदन्यत्र तें परम । सनक्षत्रसंध्या परम । हो मध्यम लुप्त तारा।।२३।।

चाक्षु ष सूर्यदर्शन । प्रातःसंध्या अधम जाण । ह्या उलट रात्रौ जाण । उपस्थान सूर्येक्षणें।।२४।।

त्या आ धी आचमन । प्राणायाम मार्जन । मंत्राचमन मार्जन । अघमर्षण अर्घ्यदान।।२५।।

मन स्स माधानें द्या तीन । कालात्ययें चौथें जाण । सूर्योदयविघ्नकारण । रक्षोगण मरती ह्यांनी।।२६।।

ह्या दु र्वा रास्त्रें मारितां । दोष येतो, भूमी फिरतां । असावादित्य जपतां । ये शुद्धता ब्राह्मणासी।।२७।।

हो स्व स्सो पानभूत । कर्म कीजे सदोदित । शुभासनी न्याससहित । जपा स्मरत ऋष्यादिक।।२८।।

जप मो जा अक्षमालेनें । किंवा स्फटिकादिकानें । निष्फळ तो मुद्राविणें । समाधानें मौनें जपा।।२९।।

लय[1] भू ल पडूं न द्यावी । छन्नमाला न पडावी । गायत्री हजार जपावी । कमी योजावे अशक्तत्वें।।३०।।

वृद्ध त्वा दि तारतम्यें । जपिजे न धनकाम्यें । उभ्यानें दोन संध्ये । सायंसंध्येसी बसून।।३१।।

उभें र हावें उपस्थानीं । दिशा देवा द्विजा नमूनि । गुरुपादातें वंदुनि । विसर्जोनी द्यावी संध्या।।३२।।

हो अ सा हा संध्याविधी । सायंप्रातर्होमविधी । कीजें स्वयें उदया आधीं । प्रादुष्करण मग हो।।३३।।

१. झोप

हा आ त्म स्त्री सुतादिकें । कीजे गव्यधान्यादिकें । धर्म करितां श्रमदुःखें । नच लेखें चित्तीं विप्रा।।३४।।
भोग कः पदार्थ द्विजा । कर्मे होयी शुद्धी निजा । आनंदा घे तोचि सहजा । देवपूजा हीच मुख्य।।३५।।
होम अ सा झाल्यावर । ब्रह्मयज्ञ कीजे बाहेर । ब्रह्मांजळी सपवित्र । म्हणा मंत्र ब्राह्मण अंगें।।३६।।
विद्या हं कारवर्जितां । ब्रह्मयज्ञ दे मुक्तता । दोष नसे कसे[१] पढतां । जपाल्पता अनध्यायीं।।३७।।
कोणी वै श्वदेवोत्तर । करिती मध्यसंध्योत्तर । तर्पा देवर्षिपितर । सव्य निवीत्यपसव्येंसी।।३८।।
हो वि श्वा त्माऽऽब्रह्मस्तंबांत। तर्पणें तृप्त यवाक्षत। देवर्षीला करिती तृप्त। पितरां तृप्त करिती तिल।।३९।।
गृहीं न हें तिलतर्पण। निंद्यदिनीं मांगल्यीं न । दिवाळींत यमतर्पण । भीष्माष्टमीसी।।४०।।
हें क रो जीवत्पिता । दोष अनवश्य करितां । मध्यान्हीं सूर्य येतां । मध्यान्हसंध्या कीजे।।४१।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे आह्निककर्मनिरूपणं नाम षष्ट्त्रिंशोऽध्यायः।।३६।।ग्रं. सं.।।४७८।।

गृह भू मी संमार्जन । कीजे नित्य लेपरंजन । शालग्रामशिला धेनु । गृहीं राखून ठेवा गव्य।।१।।
गृहीं त्वा दे गृहमेधीय । अग्निहोत्र किंवा गृह्य । हो संध्यावत् देवपूज्य । पशुतुल्यत्व अन्यथा।।२।।
किंवा प्रा तर्विस्तरानें । दुपारीं पंचोपचारानें । सायंकाळीं निरांजनें । आठ स्थानें पूजनाचीं।।३।।
जे को णि न पूजती । ते यमदंड घेतीं । वेदमंत्रें द्विज पूजिती । पौराणोक्तीं स्त्रीशूद्रादि।।४।।
विपि नां तोत्थ मध्यम । क्रीत हीन, स्वीय उत्तम । तसीं श्वेत रक्त श्याम । पुष्पें अधम शूद्रानीत।।५।।

न द्या दे वा सकृमिच्छिद्रा । दुर्गे दुर्वा, केवडा हरा । वर्जा तुळसी गणेश्वरा । धत्तूरार्कादि कृष्णा।।६।।
वाम ह स्ताकडे कलश। पुष्पादिकां दक्षिण देश। शंख घंटा वामदक्षिणेस। कीजे न्यास देहीं देवीं।।७।।
कायें मा नसें वाचें द्विजां । षोडशोपचारें पूजा । मिळतां पंचामृतें पूजा । स्नानापूर्वी नंतर भूषा।।८।।
तवा श्रि त मी मला तारीं। म्हणुनी निर्माल्य घे शिरीं। भावें मंत्रजप करीं। तीर्थ पी शिरी घे उद्वासीं।।९।।
घे अं तः करणीं देवा । पंचसूना दोष जावा । जरी तरी वैश्वदेवा । प्रातःसायं स्वान्नशुध्यर्थ।।१०।।
याचें प्रा तःकालारंभण । होम करी तो देवयज्ञ । हो बळी तो भूतयज्ञ । पितृनृयज्ञ तत्तर्पणें।।११।।
वीक्ष णा र्थ अतिथीसी । किंचित् ठरा अंगणदेशीं । येतां अन्न द्या शक्तीसी। द्या यतीसी सजलान्न।।१२।।
ओले पा द मुख कर । जेवा घेऊनी परिवार । नेणत्यासी वाढा दूर । नच करा पंक्तिभेद।।१३।।
घालू न चित्राहुति । आपोशन घ्या मौन स्थिती । घ्याव्या मंत्रे प्राणाहुति । पात्र हातीं धरूनिया।।१४।।
सर्वा स प्राणाहुत्यंत । मौन पुढे विकल्पित । पात्रीं टांका न उच्छिष्ट । जल पितां शब्द वर्ज्य।।१५।।
दीप मा वळतां न खावें । रजस्वलांत्यां न देखावें । त्याचें शब्द न ऐकावें । न शिवावे परस्पर।।१६।।
दुर्वा यु अधो जातां । अन्न त्यजा कीटयुक्ता । न जेवावें वांती होतां । केश पडतां प्रोक्षुनि घ्यावें।।१७।।
वियु[1] क्तः स्याद् द्विजत्वात्स । पलाण्डुलशुनादिभुक् । तामसाहारभुग्दुर्धीः । सात्त्विकाहारभुक्सुधीः[2]।।१८।।
आज्य प योन्न[3] लवण । सर्व खावें अन्य अन्न । सशेष द्यावें उच्छिष्टान्न । आपोशन अर्धे प्यावें।।१९।।

१. तिष्ठन्व्रजन्नासीनः शयानो वा. २. कांदे,लसुण वगैरे भक्षण केल्यास द्विज द्विजत्वापासून भ्रष्ट होतो. सात्विकान्न सेवनाने ज्ञावृद्धी व तामसान्न भक्षणानें अज्ञानवृद्धी होते. ३. पायस

मुखा चा शोधनासी । वर्जावें तर्जनीसी । मुख हस्तांघ्री शुचीसी । द्विराचमनें बोलियेलें।।२०।।
घ्या स म्य क तांबूलादि । ऐकावें पुराणादि । कीजे सायंसंध्याविधि । भोजनादि पूर्ववत्।।२१।।
क्षीरा न्न रात्रीं शस्त । दिवाकर्म प्राक्प्रहरांत । रात्रौ वर्जा सौरपाठ । निशीथांत रात्रिकर्म।।२२।।
जैं प ञ्च यज्ञादिक चुके। कीजे प्रायश्चित्त विवेकें। सुखशायिनिशां वंदा, सुखें। निजा ईशा अर्पून कर्म।।२३।।
स्त्रीऋ तु कालीं करा रति । पर्व मूल मघा रेवती । वर्जा दिवा श्राद्धव्रती । ऋतुगामी ब्रह्मचारी।।२४।।
न गु र्वि णीशीं रमावें । रतीं कोप द्वेष त्यजावे । ऋतु चुकवूनी न जावें । जातां पावे भ्रूणहत्या।।२५।।
घर धं दा होतांहि विप्रा। न सोडावें निजाचारा। गुरु ऐसें कथिती विप्रा। तो आचार करूनि तरे।।२६।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे आह्निककर्मनिरूपणं नाम सप्तत्रिंशोऽध्यायः।।३७।।ग्रं. सं.।।५०४।।

गुरू स भिक्षा द्याया आला। भास्कर विप्र सामग्रीला। तिघां पुरति घेउनि त्याला। भक्ती नेला प्रसादा।।१।।
तो स र्व सामग्रीला । निजे घेऊनी उसेला । तीन मास असा त्याला । न मिळाला शून्य वार।।२।।
त्या हा स्य करिती लोक । गुरु करविती पाक । म्हणती सांगे सर्व लोक । तो सांगे सर्वां भोजना।।३।।
ते त्या चा बोला हंसती । कण वांट्या न ये म्हणती । तें तो सांगे गुरूप्रती । बोलविती ते त्यां सर्वां।।४।।
निर हं कार तो ब्राह्मण । करी पाक सुनिष्पन्न । गुरु वस्त्रें झांकवून । नेववून वाढविता।।५।।
द्विज हृ ष्टचित्त जेविती । थोर सान सर्व येती । चार हजार झाली मिती । ते जेविती आकंठ।।६।।

अन्न दि ल्हें सर्व जातीला । आचंडालश्वकाकांला। तरी तोटा नाहीं आला । जेवविला गुरूने विप्रा।।७।।

अन्न सं पेना तें जळीं । जलचरां दे त्या वेळीं । झाली ख्याती भूमंडळीं । वर त्यावेळीं देती विप्रा।।८।।

हर्षु नि यां वदती लोक । तिघांपुरता होता पाक । जेविले हे अमित लोक । हें कौतुक दुसरें ऐक।।९।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे अन्नपूर्तिकरणं नाम अष्टत्रिंशोऽध्यायः।।३८।।ग्रं. सं.।।५१३।।

एक वि प्र सोमनाथ । तत्स्त्री वृद्धा वंध्या ख्यात । सेवी भावें गुरुनाथ । गुरु पुसती वांछा काय।।१।।

ती क ष्टो नी तयां म्हणे । अपुत्रा मी व्यर्थ शिणें । अश्वत्थाला भजतां जिणें । गेले भेणें पुढती वाटे।।२।।

पुढें म ला होवो सुत। गुरु म्हणे कोण जाणत। पुढचें, आतां कन्यासुत। होवो म्हणे, ती गांठ बांधीं।।३।।

गुरू त्त म म्हणे हरी । पिंपळाची निंदा न करी । आम्ही सर्व देव त्यावरी । ब्रह्मा सांगे नारदातें।।४।।

श्रुति स्मृ ती ज्याला गाती । त्याला करी मंदगती । प्रदक्षिणा लक्ष मिती । करीं अंतीं उद्यापन।।५।।

द्यावे ति ल स्वर्णाश्वत्थ । विप्रां भोजन दे निश्चित । होती तुज कन्या सुत । नारी म्हणतसे देवा।।६।।

मी दु र्ज्ञा ना वंचूं कशी । साठ वर्षे झालीं वयासी । होत नाहीं विटाळशी । तरी तशीच मी सेवी।।७।।

ती त्यां न मुनी सेवी तशी। शीघ्र झाली विटाळशी। गर्भ धरी पांचवे दिवशीं। कन्या तीसी झाली शुभा।।८।।

पर म हर्षे त्या कन्येसी। आणी नारी गुरूपाशीं। गुरु म्हणे हो सती, ईसी। दीक्षित पति लाधेल।।९।।

तुझे पो टीं मूर्ख शतायू। किंवा यावा बुध अल्पायू। ती म्हणे हो कां अल्पायू। दीर्घायू मूढ किमर्थ।।१०।।

व्हावे ह र्षद पंचसुत । तया म्हणे गुरुनाथ । कन्ये घेउनी गृहाप्रत । ये हंसत ब्राह्मणी ती।।११।।
झाला नं दन शीघ्र तिला। विद्वान् सर्वगुणी भला। पांच पुत्र झाले त्याला। सर्वां झाला विस्मय।।१२।।
तशी च कन्या दीक्षिताची। पत्नी झाली सती साची। कीर्ति पसरली त्यांची। श्रीगुरूची असी दया।।१३।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे वृद्धावन्ध्याप्रसवो नामैकोनचत्वारिंशोऽध्यायः।।३९।।ग्रं. सं.।।५२६।।

एक वे दज्ञ ब्राह्मण । श्वेतकुष्ठें व्यापून । गुरूप्रति येऊन । म्हणे दीनानाथा तारीं।।१।।
झालों दै वें कुष्ठी म्हणून। तोंड हें न पाहती जन। ह्याचें करीं तूं शमन। नातरीं प्राण सोडीन मी।।२।।
पुर श्च र्यादिकें पाप । न जातां हो उलट ताप । देवा तूंची मायबाप । माझें पाप शमवीं हें।।३।।
आश्वा स न देती गुरु । तंव आला एक नर । शुष्ककाष्ठ डोईवर । घेवोनी ठरला तो तेथें।।४।।
अपू र्वै क चमत्कार । करूं इच्छी गुरुवर । सांगे विप्रा घे झडकर । संगमावर रोवीं काष्ठा।।५।।
अवि र त सेवीं यासी। पाला येतां शुची होसी। द्विज रोवी त्या काष्ठासी। सद्भावें जल शिंपी।।६।।
लोक ह सुनी वारिती । नायके तो गुरूप्रती । ते येवोनी ते सांगती । गुरु म्हणती भाव फले।।७।।
अप्र मे य भावफल। धनंजयवाक्यें सुशील। लिंगा चिताभस्म दे भिल्ल। एकदां लब्ध न हो भस्म।।८।।
इच्छी व पू जाळावया। मला जाळीं म्हणे भार्या। भस्म दे, तिला जाळूनियां। प्रसाद घ्याया आली तीच।।९।।
तये वे ळीं प्रगटे हर । तयां देई इष्ट वर । असा भावाचा प्रकार । म्हणूनी गुरु जाती तेथें।।१०।।

त्या उ द्यो गातें पाहून । करिती काष्ठा प्रोक्षण । आले अंकुर फुटोन । विप्र स्वर्णवर्ण झाला ।।११।।

बर वे अंकुर फुटले । कुष्ठ सर्व मावळलें । द्विजें स्तवना आरंभिले । तैं उदेले अष्टभाव ।।१२।।

शांत दां त इंदुकोटिकांतदीप्त अत्रिनंदना । देववृंदवंद्यपाद दत्त भक्तचित्तरंजना ।।१३।।

पाप[१] त प्ततापभंजना सनातना जनार्दना । मायिकांधकारसूर्य दत्त भक्तचित्तरंजना[१] ।।१४।।

दत्त कृ तकामरोष[२] वेषधारि भिक्षु तूं जना । इष्ट देसि धर्म पासि दत्त भक्तचित्तरंजना[२] ।।१५।।

राग द्वे ष दोष वारिं, तारिं सूर्यचंद्रलोचना[३] । भक्तकामधेनु तूंची दत्त भक्तचित्तरंजना[३] ।।१६।।

हस्तिं[४] द ण्ड कुंडि घेसि देसि जीव वीतजीवना । रक्तपद्मपत्रनेत्र दत्त भक्तचित्तरंजना[४] ।।१७।।

तूंचि वि श्वहेतु[५] मंतु सोसि होसि मायबाप ना । नित्य शुद्ध बुद्ध मुक्त दत्त भक्तचित्तरंजना[५] ।।१८।।

तूंचि दे व[६] योगि होसि नासिं दैन्यदुःखकानना । न्यासि होसी कृष्णावासि दत्त भक्तचित्तरंजना[६] ।।१९।।

१. पापाने तापलेल्याचें दुःख नाहीसे करणाऱ्या, शाश्वत, जनार्दना, मायंधकाराला सूर्यासारखा व भक्तांच्या अंतःकरणाला रमविणाऱ्या.२. काम, राग ज्याने नष्ट केले आहेत तो तू संन्याशाचें रूप घेऊन लोकांचे इच्छित देतोस. ३. चंद्र, सूर्य हे ज्याचे डोळे आहेत शा व भक्तांच्या अंतःकरणाला रमविणाऱ्या दत्ता, राग द्वेष इत्यादि दोष दूर कर आणि आम्हांस तार. तूच भक्तांना कामधेनू आहेस.४. तांबड्या कमळाच्या पाकळीप्रमाणे ज्याचे डोळे आहेत अशा, भक्तांच्या अंतःकरणाला रमविणाऱ्या दत्ता, हातांत दंडकमंडलू घेतोस व मृताला जीवंत करितोस. ५. तू विश्वाला हेतु असून त्याचे अपराध सोसणारा मायबाप, नित्य, शुद्ध व मुक्त अशा भक्तांच्या अंतःकरणाला रमविणाऱ्या दत्ता, तुला नमस्कार असो. ६. भक्तांच्या अंतःकरणाला रमविणाऱ्या दत्ता, तूंच देव असून योगी आहेस. दैन्य व दुःखाच्या अपायांचा नाश कर. तूंच संन्यासी होऊन कृष्णतीरीं वास करितोस. ७. भक्तांच्या अंतःकरणाला रमविणाऱ्या दत्ता, आदि, मध्य व अंतरहित अशी ब्रह्मवस्तू तूच आहेस. वासना दूर कर आणि भक्ति देऊन तार.

ब्रह्म[७] व स्तु तूं अनादिमध्यनाश खास वासना । वारिं, भक्ति देयि तारिं दत्त भक्तचित्तरंजना[९]।।२०।।

तया चा भाव जाणुनि विप्रा।विद्यासरस्वतीमंत्रा।देऊनियां सकलत्रा। राहवी मित्रापरी गुरु।।२१।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे विप्रकुष्ठहरणं नाम चत्वारिंशोऽध्यायः।।४०।।ग्रं. सं.।।५४७।।

निर हं कार त्वत्पूर्वज । सायंदेव कथिला तुज । गाणगापुरीं वसे निज । गुरुराज साक्षाद्देव।।१।।

ही त द्वा र्ता परिसून । ये घालित लोटांगण । देवा पहातां हो तल्लीन । करी स्तवन प्रेमरसें।।२।।

गुरु वि चारिती क्षेम । येरू सांगे धरूनी प्रेम । भवत्सेवाकाम । धरूनी धाम सोडियेलें।।३।।

घ्यावी मौ ज भक्तिरसाची। असी इच्छा हे मनाची। गुरु म्हणे सेवा आमुची। कठिण साची नेणसी तूं।।४।।

कधीं पु रामध्यें वास। ग्रामीं वनीं नदीतीरास। तुला होती कष्ट सायास। कां तूं त्रास पतकरसी।।५।।

तो क रु नी अंगिकार । राहे गुरूच्या बरोबर । त्याला एकला बाहेर । संगमावर न्हेति गुरु।।६।।

जो दो षौ घा[१] स्मरणें हरी। तो संकटीं त्यजि कीं हरी। हार्दें शिष्यपरीक्षा करी। आज्ञा करी मेघा वर्षू।।७।।

तेव्हां लो टुनी टांकी वारा। वर्षे मेघ मोठ्या धारा। द्विजें साहुनी वृष्टी वारा। रक्षिलें वस्त्राश्रयें देवा।।८।।

गुरु के वल परीक्षार्थ। अग्नि आणावया धाडित। विद्युत्तेजें ये गांवांत। अग्नि भांड्यांत घेऊन ये।।९।।

प्रत्य क्ष पथिं[२] सर्पा देखे। पळतां, मठीं ध्वनी ऐके। प्रकाश देखे मनीं ठके। येऊनि देखे एका देवा।।१०।।

१. दोषसमूह २. मार्गामध्ये

सर्प र क्षार्थ धाडिले। तुझें मन वायां भ्यालें। कठिण सेवा हें कळलें। साहस केलें त्वा गुरु म्हणे।।११।।

हो प श्चा त्ताप कीं तुला। द्विज म्हणे देवा मला। जाणसी, मी काय तुला। सांगू, मला न दवडी।।१२।।

प्रत्य क्ष तूं ब्रह्मनिधान । गुरुसेवेचें विधान । सांगा तेणें स्थिर होईन । तें ऐकून गुरु सांगे।।१३।।

कुमा र त्वष्टृदेवाचा । विद्यार्थी हो गुरूचा । भाव पहावया त्याचा । गुरु साचा वदे तया।।१४।।

करीं ए क गृह निर्माण। जें न तुटे नोहे जीर्ण। करी वृष्ट्यादि निवारण। तें ऐकून तत्स्त्री बोले।।१५।।

न शि व ली न विणली। अंगाबरोबर भली । अशी रम्य मज चोळी । त्यावेळीं तत्सुत बोले।।१६।।

माझ्या च रणा सुख देती। खात न लागे, मनोगती। दे पादुका जळीं न बुडती। गुरुकन्या तीही बोले।।१७।।

हो अ क्ष यैकस्तंभघर । न हो पात्रीं पाक गार । काजळ न लागे त्यावर । दे सुंदर कुंडले हीं।।१८।।

कुमा र तो स्वीकारून । त्या वंदून धरी रान । तेथें अवधूत येऊन। म्हणें का म्लान मुख तुझें।।१९।।

मन स्स माधान करून । बाळ सांगे सर्व नमून । येरू तया आश्वासून। काशीसेवन करीं म्हणे।।२०।।

जें श र्वा चें अधिष्ठान । गंगा राहे ज्या वेष्टून । सर्वदेवतीर्थस्थान । तत्सेवन करीं शीघ्र।।२१।।

न को णि ही येथ अमुक्त। म्हणोनी हें हो अविमुक्त। विरक्त किंवा विषयासक्त। तेही मुक्त होती जेथ।।२२।।

दुजें भू मंडळीं न असें । येरू वदे मी नेणतसें । काशीक्षेत्र मिळेल कसें। प्रार्थितसें मी तुम्हांसी।।२३।।

म्हणे ता प सी मी दावीन। त्वद्योगें हो मज दर्शन। असें म्हणूनी त्या घेऊन। ये तत्क्षण मनोगती।।२४।।

घेऊ नि आला मनोगति । काशीयात्रा भावभक्तीं । करीं यथाविधी, निगुती । पूर्ण होती मनोरथ।।२५।।

तो ऐ कू नि त्याचें वचन । म्हणे नेणें यात्राचरण । येरू म्हणे स्नान करून । मणिकर्णिकेचे येई।।२६।।

तूं भे ट विश्वेश्वरा । करी अंतर्गृहयात्रा । मग दक्षिणमानसयात्रा । स्नानार्चनश्राद्धदानें।।२७।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे काशीयात्रानिरूपणं नाम एकचत्वारिंशोऽध्यायः।।४१।।ग्रं. सं.।।५७४।।

तत्र स्थो दङ्मानसयात्रा । करीं पंचकोशीयात्रा । शुक्लकृष्णपक्षयात्रा । नित्ययात्रा करीं भावें।।१।।

प्रत्य क्ष चि विश्वेश्वरा । भवानी हरिधुंडीश्वरा । दंडपाणी भैरववीरा । विघ्नेश्वरा गुहा देखी।।२।।

तूं स्थि र चित्तें करीं यात्रा। स्थापीं लिंग तूं कुमारा। सुटतील येरझारा। असे म्हणोनी गुप्त झाला।।३।।

बाळ उ ठोनी पाहत । त्या न दिसे, झाला गुप्त । हाची माझा गुरु म्हणत । करीतसे तो यात्रा।।४।।

अवा च्य हो शिवलीला । इष्ट वर दे तयाला । दे तो तसें गुर्वादिकांला । तो झाला विश्वकर्मा।।५।।

द्विज ते व्हां गुरु जसें । सांगे तें तें पाहे तसें । गुरुनाथा वंदीतसे । स्तवितसे सायंदेव।।६।।

तूंची उ मापती होसी । मज दाविली येथ काशी । गुरु म्हणे त्वद्वंशासी । एकविंशी घडे यात्रा।।७।।

तूं स त्त म लोकीं होसी। आतां न सेवीं म्लेंच्छासी। आणूनियां स्त्रीपुत्रांसी। आम्हापाशीं रहा सेवित।।८।।

तो न मः स्कारूनी गेला । स्वकुटुंबा घेऊनि आला । स्तवि पुनः श्रीगुरूला । कानडीस्तोत्रालापें।।९।।

त्याचा पु त्र नागनाथ । तया वर दे गुरुनाथ । सांगे सायंदेवा स्वस्थ । करी अनंतव्रत आजी।।१०।।

१. निस्तेजपणा

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे काशीयात्रानिरूपणं नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः।।४२।।ग्रं. सं.।।५८४।।

दे पु रु षार्थ नरांसी । भाद्रशुक्लचतुर्दशीसी । चौदा ग्रंथी रक्तसूत्रासी । बांधी करासी पूजुनी।।१।।

संतो ष मानुनि तो पुसे । व्रत कोणी हें केलें कसें । गुरु म्हणे द्यूतीं घेतसे। पार्थराज्य दुर्योधन।।२।।

अभा[1] स्त्व पावुनि पांडव । वनीं श्रमतां ये माधव । त्याला द्याया स्ववैभव । सांगे देव अनंतव्रत।।३।।

त्वद[1] न्यः कोऽनंत इति। पुसतां म्हणे मीच श्रीपती। ऐके, सुमंतुकन्या होती। सुशीला ती पूर्वस्त्रीजा।।४।।

ती हो प त्नी कौंडिण्याची। सापत्नमाता द्वेषी तिची। अन्यत्र न्हे तिला तोची। अनंताची पूजा घे ती।।५।।

दे ब र वी श्री अनंत । वशीकार भयें अग्नींत । दोरा टाकी मुनी कुपित । दुःखाब्धींत पडे तेव्हां।।६।।

देव मा झेवर रुसला। म्हणूनी मुनी वनीं गेला। निर्वाणें तो मूर्छित पडला। त्या भेटला श्रीमदनंत।।७।।

जीवा त्मे शाभिन्नत्वेंशी । स्तुती करितां त्या ऋषीसी । वर दे सर्वैश्वर्येंसी । तत्पृष्टांशा[2] देयी मोक्ष।।८।।

त्या अ त्यु दार अनंत । पुनर्वस्वृक्ष करित । म्हणोनी कृष्ण हें व्रत । करवीत पार्थाकरवीं।।९।।

दाया दा दिकां मारून । सार्वभौम धर्म होऊन। देहासह स्वर्गीं जाण। गेला म्हणूनी करीं तूं व्रत।।१०।।

विप्र हृ ष्टतर होऊन । गुरूक्त तें हो व्रत करून। राहे गुरूला सेवून। बंध तोडून मुक्त झाला।।११।।

तूं अं तः करणी जाण । गुरुप्रसादें हो पूर्ण । तुमच्या वंशीं म्हणून । तुझें मन रंगले हे।।१२।।

याग यो गादिकांवीण। तुम्हां जोडे हेंचि निधान। असे घेती भक्तीकरून। देवा करून आपुलासा।।१३।।

१.तुझ्याहून निराळा असा अनंत दुसरा कोण आहे. २. आम्रगोवृषादिकाला

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे अनन्तव्रतकथनं नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः।।४३।।ग्रं. सं.।।५९७।।

सिंहा[१] लो कनें करून । ऐक पुढील कथन । तंतुक संसारी असून । भजे गुरूसी याममात्र[२]।।१।।

तल्लो क श्रीशैलासी । जाता बोलाविती त्यासी । तयां वदे तो गुरूपाशी । श्रीशैलेशीमल्लिकार्जुन।।२।।

सर्व त्र हा गुरु एक। पाषाण पाहूं जाती लोक। ते त्या निंदुनी गेले लोक। ये तंतुक गुरूपाशीं।।३।।

तो पा य वंदी त्यासी । गुरु पुसे का न जासी । तो तसेंचि सांगे त्यांसी । चतुर्दशी पुढे आली।।४।।

नभो[३] मा र्गे गुरु तया। नेऊनी दाविती श्रीशैल्या। देवा पाहे तो लोक तया। पुसोनी साच न मानी।।५।।

लिंगीं वि लोकी तैं गुरूसी। स्थानमाहात्म्य गुरु त्यासी। सांगे पंपापुरी शिवासी। पाहुनि श्वाना ये राजत्व।।६।।

स्त्रीव श्य तो जरि कां शैव। पुसतां स्त्रीला प्राक्स्वभाव। सांगे, राणी पुसे स्वभाव। म्हणे तो कवडी तूं पूर्वी।।७।।

आलं[४] बि लें मांस पाहून । श्रीशैलाग्रीं घार येऊन । तुजला मारी म्हणून । राणी होऊन रमसी।।८।।

तूं मी भ विष्यषड्जन्मीं । होवूं राजे, अंती स्वधामीं। जावूं म्हणे तंतुका मीं। क्षेत्रधामी आणिलें तुला।।९।।

जैं व र्त्य ग्रीं लागे आग । तैं हो शीघ्र ध्वांतभंग । तसा होता गुरुसंग । आवृत्तिभंग[५] हो तयाचा।।१०।।

त्या अ व्य ग्रा गुरु संगमीं। आणवूनी धाडिती ग्रामीं। त्याला भ्रांत म्हणती ग्रामी। मठधामीं आणी भक्ता तो।।११।।

प्रत्य य ये यात्रिक येतां। सर्वांला ये निभ्रांतता। म्हणती देव गुरुनाथा । तंतुका भक्ताग्र्य मानिती।।१२।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे श्रीपर्वतयात्रावर्णनं नाम चतुश्चत्वारिंशोऽध्यायः।।४४।।ग्रं. सं.।।६०९।।

१. मागील कथासंदर्भ साक्षात २. एक प्रहर ३. आकाशमार्गाने ४. घेतलेले ५. जन्ममरणनाश

ऐकें ई श्वरप्रभाव । नंदिनाम एक भूदेव[1] । कुष्ठें व्यापुनी घें धांव । देवीपाशीं तुळजापुरीं।।१।।
त्या ई श्व री जा गुरूपाशीं। म्हणें तो बोलें कां नरापाशी। धाडिशीं मग भोपे[2]यांसी। सागून त्यासी घालविलें।।२।।
धी पु रः सर नावडतां । तो ये भेटे गुरुनाथा । गुरु म्हणे तूं कां आतां । आलास रे नरापाशीं।।३।।
स्वकी य खूण ओळखून। तो प्रार्थी त्या देव मानून। गुरु म्हणे पापे करून। कुष्ठें व्यापून गेलासी।।४।।
अक स्मात् पाप हो दूरीं । या संगमी स्नान तूं करीं। म्हणोनी त्याबरोबरी। सोमनाथासी धाडिती।।५।।
तो त्या क्ष णीं स्नान करी । अश्वत्था प्रदक्षिणा करी। मठीं ये त्या अवसरी। पाहें शरीरी गुरु म्हणे।।६।।
शरी र त्याचें दिव्य झालें। किंचित् जंघेसी राहिलें। पुसे कुष्ठ हें कां राहिलें। गुरु बोले, विकल्पानें।।७।।
त्वां जी म नुष्यधी धरिली। तीच तुज आड आली। माझी स्तुती करी भली। म्हणे तो लिखितही नेणें।।८।।
विभू ती मग जिव्हेवर। टाकूनी, गुरु म्हणे स्तोत्र। करी, मग तो होयी धीर। करी स्तोत्र श्रीगुरूचें।।९।।
आत्मा तो तूं सर्वाधीश । शुद्ध बुद्ध नित्य त्रीश । तुला नेणुनि कर्मपाशें । बद्ध होती जीव अज्ञानें।।१०।।
ते अ ह ङ्कारें त्रिविध । पापें, घेती योनी विविध । समपापपुण्यें त्रिविध । नर होती रक्तरेतें।।११।।
गर्भी म हा कष्ट भोगी । सोडवाया प्रार्थी विरागी । उपजतां वेगीं । पुढें भोगी होऊनि मरे।।१२।।
त्वद्दी[3] क्ष णा विना कैसा। मोक्षा जाईल हा पिसा। तूंची कृपा करीं ऐसा। प्रार्थी मानसा स्थिरवून।।१३।।
गेलें रा हिलेलें कुष्ठ । जहाला तो गुरुप्रेष्ठ[4] । कविता करी कविश्रेष्ठ । एकनिष्ठ गुरुपदीं।।१४।।

१. ब्राह्मण २. पुजारी. ३. तुझ्या कृपादृष्टीवाचून ४. प्रिय

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे ब्राह्मणकुष्ठनिवारणं नाम पञ्चचत्वारिंशोऽध्यायः।।४५।।ग्रं. सं.।।६२३।।

विश द तत्कवितारीती । नृकेसरी तो नरस्तुती । मानुनि निंदी, त्याचे चित्ती । गुरुमूर्ति प्रगटली।।१।।
लिंग पि ण्डीवर बैसोन । पंचकवित्व पूजन । गुरु घेती, ते पाहून । तो येऊन प्रार्थी गुरूसी।।२।।
तूं वं चो नी कां देवासी। मूर्खपणें नरा स्तविसी। असें गुरु पुसे त्यासी। प्रार्थुनि त्यांसी तो हो शिष्य।।३।।
हे उ त्त मकवी दोन । गुरूसी गाती अनुदिन[1]। गुरु प्रसन्न होऊन । उद्धरून न्हेती तयां।।४।।
जैं त[2] मः शांती करी रवी। तैं हा भक्ताज्ञान नुरवी। येथ हो शांत दुजा रवी। कीर्ति बरवी दावी लोकीं।।५।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे कवीश्वरउपदेशो नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः।।४६।।ग्रं. सं.।।६२८।।

भक्त अ तिप्रिय सात । दिवाळीच्या सणानिमित्त । न्याया गुरूसी गृहाप्रत। प्रार्थिती सप्तग्रामवासी।।१।।
गुरु तो षवाया तयां । सात रूपें धरूनियां । जाती सातांच्या आलया[3] । राहूनिया तया ग्रामीं।।२।।
तों वि स्मि त होउनी पुढती । एकमेकां झगडती । माझे घरीं गुरुमूर्ति । करिती दीपावळी असें।।३।।
ग्राम लो क मिथ्या म्हणती। येथेंची होते गुरुमूर्ती। दिल्ही खूण सर्व दाविती। गुरु म्हणती सर्व सत्य।।४।।
होसी के वळ परब्रह्म । असें स्तविती ते सप्रेम । तयां भक्तां गुरूत्तम । देती धाम अलभ्य जें।।५।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे दीपावल्युत्सववर्णनं नाम सप्तचत्वारिंशोऽध्यायः।।४७।।ग्रं. सं.।।६३३।।

१. रात्रंदिवस २. अंधकार. ३. घरी

जो हो वे दां अगोचर । तो भक्तां हो सुगोचर । तया ग्रामीं भक्त शूद्र । नमस्कार करी नित्य।।१।।

गुरु दे व संगमीं जाती। त्या पाहून करी प्रणती। पुनः ये तो येणें रीती। करी भक्ती शेती करितां।।२।।

लोकीं च मत्कार करावया। शूद्रा वदे गुरुराया। कच्चे पीक हें कापुनियां। टाकी मध्यान्हापावेतों।।३।।

तो तें प्र माण मानून । स्वामीभागा ठरवून । कापी तत्स्त्री येऊन । करी विघ्न तरी न हटे।।४।।

तें क थि ती अधिका-यांसी। शूद्र न जुमानी त्यासी। दावी मध्यान्हीं गुरूसी। म्हणे शेतासी कापिलें।।५।।

तू अ तः पर काय खासी । असें गुरु पुसे त्यासी। म्हणे तुझ्या प्रसादेंसी। लाभ आम्हासी होईल।।६।।

त्याचे पु रवाया हेत । वृष्टी मूलर्क्षीं पाडित । शतगुण त्या शेतांत । गुरुनाथ धान्य देती।।७।।

तो क रु नी क्षेत्रपपूजा। सस्त्रीक करी गुरुपूजा। स्वामिभाग देउनि द्विजां। धान्यपुंजा वांटी हर्षें।।८।।

संतो षो नी गुरुमूर्ती। त्याच्या वंशा गती देती। अशा लीला केल्या किती। त्यातें नेणती ब्रह्मादिक।।९।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे शूद्रधान्यप्रवृद्धिवर्णनं नाम अष्टचत्वारिंशोऽध्यायः।।४८।।ग्रं. सं.।।६४२।।

हें उ त्त म असे क्षेत्र । भीमामरजायोग थोर । रणीं सुरां मारी जालंधर । अमृतें हर त्यां उठवी।।१।।

हृत्त मः प्रकाशक । शिव दे अमृत विशोक । उलंडलें तेंची ऐक । ती हे नदी अमरजा।।२।।

ही भ यो पताप वारी । भीमेशी संगम करी । प्रयागापरी पाप वारी । भूमीवरी हे तारक।।३।।

सर्व मा न्य मनोहृत्तीर्थ । जेंथ कल्पद्रु अश्वत्थ । पुढें संतोषाख्यतीर्थ । विश्वनाथ येथ आला।।४।।

ही उ मे शप्रसादानें । एका जीवन्मुक्तानें । काशी केली ती स्नानानें । कैवल्यानें निःसंशयें।।५।।
तया व री पापविनाश । तीर्थ दावित यतीश । तो भेटे त्या समयास । पूर्वाश्रमस्वसा रत्ना।।६।।
ती त्या म हा तीर्थी न्हाली। कुष्ठ जाऊनी शुद्ध झाली। गुर्वाज्ञेनें तेथें राहिली। मुक्त झाली त्याच जन्मी।।७।।
वारी सं कट कोटितीर्थ । पुढें दाविती रुद्रतीर्थ । गयेसम फल तेथ । चक्रतीर्थ केशवापुढें।।८।।
हें स मू ळ वारी दुरित । अस्थी करी चक्रांकित । द्वारकेहुनी हे प्रशस्त । हो पतित स्नानें ज्ञानी।।९।।
ज्या वे ढो न असे माया । येथ स्नान करितां तया । ये मुक्तता सुनिश्चया । गुरुराया सांगे लोकां।।१०।।
तो पू जा वा कल्लेश्वर । प्राग्भागीं गोकर्णक्षेत्र । चक्रतीर्थ हें पवित्र । असे क्षेत्रमाहात्म्य हें।।११।।
अज्ञा ना नें कली येतां । सर्वतीर्थां ये गुप्तता । गुरुनाथें तीं दावितां । लोकचित्ता हो आनंद।।१२।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे गाणगापुरवर्णनं नाम एकोनपञ्चाशत्तमोऽध्यायः।।४९।।ग्रं. सं.।।६५४।।

ज्या दे ति श्रीपाद वर । तो रजक जन्मांतर । करी हो म्लेंच्छ राजा शूर । धर्मावर मन ज्याचें।।१।।
त्याचे पु रोहित म्हणती । हिंदु पाषाण पूजिती । भू गो जला देव म्हणती । ती दुर्मति, न वंदावे।।२।।
राजा रु सोनि बोलत । सत्य असे त्यांचे मत । जे द्वेषिती तयांप्रत । मी प्राणान्त दंड करीन।।३।।
द्या द्वे षो क्ति सोडून । असें तयां कथीं ज्ञान । मांडीवर फोड होवून । तो पीडून राहें दैवें।।४।।
त्या उ त्त म लेप करिती । परि त्याची नोहे शांति । राजा पुसे द्विजाप्रती । तो एकांतीं सांगूं म्हणे।।५।।

राजा मं त्र्यांदिकां त्यजून। एकलाची करी गमन। पापनाशतीर्थी येऊन। पुसे वंदून तया विप्रा।।६।।

आश्वा स न देयी द्विज । सत्पुरुषासी भज । भवरोग हो निर्बीज । भय तुज कायसें ह्याचें।।७।।

एक स र्वकर्महीन । उज्जनींत होता जाण । द्विज वेश्येसीं रमून । तद्‌गृहीं ये ऋषभयोगी।।८।।

तत्पू र्व पुण्य उदेलें । म्हणोनि मुनि भेटले । दोघांनी त्यां पूजिलें । सेवियलें अहोरात्र।।९।।

त्या से वि ल्या पुण्यानें । राजकुळी जन्म घेणें। घडलें, तयापरी भोगणें। आलें उणें जें स्वकर्म।।१०।।

जो स द्‌भ क्त हो सकाम। त्या ये श्रीमत्कुळीं जन्म। मुक्ति घेयी जो निष्काम। सत्समागम व्यर्थ नोहे।।११।।

द्विजा ज न्म दशार्णदेशीं । वज्रबाहुराजवंशीं । ज्येष्ठराणीच्या ये कुशीं । तें सवतीसी न रुचलें।।१२।।

यत्नें ति णें गर्भिणीतें । सर्पगरळ दिलें होतें । भेदलें परी न प्राणातें । हरि, तीतें देव राखी।।१३।।

तिचें मां स रक्त बिघडे । तिला बहु कष्ट घडे । पुत्रा प्रसवली पुढें । व्रण पीडे उभयतां।।१४।।

झाले स र्वोपाय अपाय । तयां आरोग्य न होय । एके दिनीं तयां राय। विजनारण्यदेशीं टाकी।।१५।।

ती पू र्व कर्म स्मरून । बाळा कडेवर घेऊन । वनीं करी आक्रंदन । तों गोधन पुढें देखे।।१६।।

राज भा मिनी गोपतीतें । पुसोनी ये नगरातें । वणिक्पती राखी तीतें । व्रणकष्टें पुत्र मेला।।१७।।

तों दै वे ऋषभयोगी । ती रडतां आला वेगीं । तिला म्हणे राहें उगी । शोक त्यागीं विवेकानें।।१८।।

सांगो न सदुपदेश । स्मरे पूर्वोपकारास । जीववी तो त्या सुतास । त्या दोघांस दे आरोग्य।।१९।।

असा भा ग्यें सत्पुरुष । भेटे तरी जाई दोष । राजा पुसे सत्पुरुष । असे दोषहर कोठें।।२०।।

भूसु र म्हणे भूपाप्रती । भीमातीरीं असे यती । नामें नृसिंहसरस्वती । तयाप्रति जा भेटाया।।२१।।

राजा	त	थास्तु म्हणून । तया विप्रा सत्कारून । चतुरंग दळ घेऊन । भाव धरून पातला।।२२।।
तो पा	इ	क दूरी करून । पायीं चालत येऊन । संगमीं देवा पाहून । करी नमन एकभावें।।२३।।
म्हण	ति	श्रीगुरु रजका। कोठे वससी येसी न कां। भेटावया रे भाविका। तें ऐकूनी तो हो ज्ञानी।।२४।।
निज	गु	ज प्राग्जन्मीचें। आठवी रूप श्रीपादाचें। त्या वळखूनी मृदु वाचें। करी त्यांचें तो स्तवन।।२५।।
कां बा	ह्य	विषयाब्धींत । लोटिसी तूं कृपावंत । आता धरीं माझा हात । वरी त्वरित काढी मज।।२६।।
तूं हा	त	माझा धरितां । मी येईन हो वरता । मांडीवरी फोड होतां । त्या निमित्तानें ही भेट।।२७।।
माझा	मं	गळ हो भाव। गुरु म्हणे फोडा दाखिव। येरू मांडी पाहे तंव। स्फोटकाभाव झालाची।।२८।।
म्हणे	शा	बास हे भेट । माझा गमविला स्फोट। म्हणे नेणे मी हें कूट। द्यावी भेट हा तव हेतू।।२९।।
मी शा	स्त्र	बाह्य जरी । गोहत्यादिक न करी । म्हणे माझी पहा पुरी । नमस्कारी वारंवार।।३०।।
तो अ	मि	त सेना दावी। तया पालखींत बैसवी। स्वयें पायीं चाले पदवी। गुरु बैसवी यानीं तया।।३१।।
पुढे	द	र्शन घे म्हणून । पापनाशतीर्थी येऊन । राहे गुरु त्या प्रार्थून । नागनाथ घरी नेयी।।३२।।
गुरु	मु	ख्य शिष्यांसहित। जेवूनियां तीर्थी येत। तो राजा त्या नगरांत। ने वाजत गाजत गात।।३३।।
विवि	क्त	दृष्टि भगवान् । जाती पुरीं भक्ताधीन । दावी सर्वा भेटवोन। प्रीती करून निजैश्वर्या।।३४।।
ती ग	म्म	त न बोलवे । महोत्सव केला रावें । आतां पाददास्य द्यावें । म्हणूनी भावें प्रार्थी भूप।।३५।।
तन	या	राज्य देऊन । तूं श्रीशैलावर येऊन । घेयीं माझें दर्शन । राव ज्ञान असो म्हणे।।३६।।

पदी न म्र झाला राव । आश्वासून गुरुराव । गाणगापुरीं पुनः ठाव । घेयी देव भक्ताधीन।।३७।।
तें अ घ हारि दर्शन । होतां जनही हर्षून । सर्व करिती नीरांजन । गुरुस्तवनपूर्वक ते।।३८।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे यवनोद्धरणं नाम पञ्चाशत्तमोऽध्यायः।।५०।।ग्रं. सं.।।६९२।।

आतां ए थें न रहावें । कलियुगीं गुप्त व्हावे । असे म्हणतां गुरुरावें । अवघे दुःखित होती ते।।१।।
गुरु त यां आश्वासून । म्हणे भजती आतां हीन । पुढे येतील दुर्दिन । हे जाणून गुप्त राहूं।।२।।
जे स द्बु द्धी असती लोक। दिसों तयांसी सम्यक। गाणगापुरी राहूं भाक। घ्या हो लोक त्रिवाचेसी।।३।।
भवा ध्वा हो तुम्हां सुगम। भजतां पादुका जे काम। ते पुरोनीं अंतीं धाम। मिळेल नाम माझें गातां।।४।।
भवां बु धितरणार्थ । भजा मज मिळेल स्वार्थ । चरित गातां मनोरथ । पुरती, व्यर्थ चिंता नसो।।५।।
हो स द्धि त पादुकार्चनीं । विघ्नहर चिंतामणी। अर्चा प्रातः कृष्णास्नानीं। जाऊनि रोज येयीन मी।।६।।
भक्ति मान् भावी जसा जसा। त्यापाशीं मी तसा तसा। गुरूचा हो बोल ऐसा। नामधारका म्हणे सिद्ध।।७।।
रह स्या र्थ गुरुचरिताचा। सिद्धनामधारकाचा। संवाद जो लोकीं साचा। सार तयाचा हा चिद्रस।।८।।
हें स त्कृ पा करुनी दत्त। वदवी प्रेरुनिया चित्त। तया पदीं हा समस्त। समर्पित असो ग्रंथ।।९।।

इतिश्री. प. प. वा. स. वि. सारे वरप्रदानं नाम एकपञ्चाशत्तमोऽध्यायः।।५१।।ग्रं. सं.।।७०१।।

।।आरती।।

जय त त्वज्ञाननिधान। अनसूयात्रिनंदन। त्वत्पदपद्मावरून। पंचप्राण ओवाळीन. जयतत्त्वज्ञाननिधान.।।१।।

करीं कृ पा मायबापा। वारीं सर्व पापतापा। निजमार्ग करीं सोपा। अनुकंपा पूर्ण करून. जयतत्त्व.।।२।।

जें अ त्य द्‌भुत तव रूप । तें ह्या चित्तीं आपोआप। राहो जें कामकोप। उपशमवी प्रगटून. जयतत्त्व।।३।।

तप श्च र्या हे आमुची। त्वत्स्मृती नित्य होवो साची। दुर्वासना मनाची। नुठवी हेंची देयीं दान. जयतत्त्व।।४।।

गुण भा वें तुझें गावें । अनासक्तीनें मी वागावें । सत्संगा आदरावें । मज द्यावें हें वरदान. जयतत्त्व।।५।।

अनु र क्ती त्वत्पदीं व्हावी। विषयी विरक्ती व्हावी। कष्ट येतां धृति व्हावी। सेवा बरवी घे हातून. जयतत्त्व.।।६।।

तार त त्सद्‌ब्रह्मार्पण । असो संपूर्णाचरण । दृढ धरुं तव चरण । न मला त्वदन्य शरण. जयतत्त्व।।७।।

कर्ता करविता दत्त । वासुदेव निमित्त येथ । तत्पदीं अर्पिला ग्रंथ । तोच येथ आदिमध्यांतीं।।१।।

झालें अठराशें सहा शकांत। द्विसहस्त्र संस्कृत गुरुचरित। त्यावरती टीका अवर्षणाब्दांत। द्वारिकाक्षेत्रीं जाहली।।२।।

गुर्जरेच्छेने तयेवरी । चूर्णिका झाली त्याचवत्सरीं । अठराशेतेवीस वत्सरीं । त्रिशती त्यावरी हो संस्कृत।।३।।

ओवीसमानार्थ श्लोक संस्कृत। हो अठराशेचोविसांत। गंगातीरीं दुजा कार्तिकात। मराठी भाषेंत हे सप्तशती।।४।।

दत्तपुराण संस्कृत । माहात्म्यसार प्राकृत । ग्रंथत्रय रसभरित । वदवी दत्त वासुदेवमुखें।।५।।

।।इति श्रीसप्तशतीगुरुचरित्रं समाप्तम्।।